**LIVE पार्श्वभूमी बीड पोर्टलसाठी**
तालुका, शहर व गावनिहाय
प्रतिनिधी नेमणे आहे
संपर्क : दै.पार्श्वभूमी कार्यालय, भाजी मंडई, बीड.
संपादक गंमत भंडारी
9422295333
8623880100

# पार्श्वभूमी

**रियांश एन्टरप्राईजेस**
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.
50% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.92 व 93 सारडा सेंट्रल, डी.पी.रोड, बीड.
Mob.9511511818

बीड वर्ष ३६ वे अंक ७२ वा फोन २३०१०१ दिनांक ९ फेब्रुवारी २०२६ सोमवार | गंमत भंडारी | ई-पेपर : www.parshvbhumi.com | Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 | पाने ६ किंमत ४रु.

# दादांच्या अपघाती मृत्युचे खा.सोनवणे, संजय राऊत, मिटकरी राजकारण करु लागले; पुरावे पाहिजेत, हवेत गोळ्या नकोत



**बीड दि.८ (प्रतिनिधी):- महाराष्ट्रातील एक कर्तबगार नेतृत्व अजितदादा पवार यांच्या अपघाती जाण्याने सगळ्या महाराष्ट्राला धक्का बसला आहे. दु:खाचा डोंगर कोसळला आहे परंतु त्यांच्या मृत्युचे विनाकारण राजकारण करुन प्रसिद्धी मिळवू नका, पुरावे असतीलच बोला, हवेत गोळ्या मारु नका. दादांच्या कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्ती म्हणून शरद पवार साहेबांकडे पाहिले जाते. त्यांनी देखील या प्रकरणात घातपाताचा संशय वाटत नसल्याची प्रतिक्रिया दिलेली आहे. अजुन या प्रकरणाचा अधिकृत तपास पूर्ण होणे बाकी आहे. तपासानंतर सत्य बाहेर येईलच, परंतु त्या अगोदरच सवंग प्रसिद्धी मिळविण्यासाठी काहीही बोलू नये अशा प्रतिक्रिया समाजमाध्यमांवर व्यक्त होत आहेत. बीडचे खा.बजरंग सोनवणे, आ.अमोल मिटकरी, खा.संजय राऊत हे दररोज वेगवेगळे विधाने करुन या प्रकरणात राजकारण करत असल्याचा आरोप केला जात आहे.**

विमान अपघातामध्ये अजितदादांचा अकाली मृत्यू झाला. अख्खा महाराष्ट्र हळहळला. सर्वांवरच दु:खाचा डोंगर कोसळलेला आहे. दादांसारखा धडाकेबाज नेता महाराष्ट्राला हवा होता, ज्या विमान अपघातात दादांचा मृत्यू झाला त्या अपघाताची चौकशी केंद्र सरकारने सुरु केली आहे. या तपासाला वेळ लागणार आहे. तपास पूर्ण झाल्यानंतर या प्रकरणातील सत्य बाहेर येणार आहे. मात्र त्या अगोदरच काही नेते या प्रकरणावर जोरात राजकारण करत आहेत. बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी काही दिवसापुर्वी एक विधान केले होते, ज्यात ते म्हणाले की दादांच्या विमानामध्ये बॉम्ब होता का? विमान जमिनीवर टेकण्यापुर्वीच स्फोट कसा झाला? त्यानंतर पुन्हा रविवारी खा.सोनवणेंनी दुसरा आरोप केला तो म्हणजे दादांच्या सोबत नेहमीचे असणारे जवळचे पी.ए.या प्रवासात का नव्हते? राष्ट्रवादीचे प्रवक्ते अमोल मिटकरी यांनीही अनेक विधाने केली आहेत. अजित पवार यांना ठार मारण्यासाठी त्यांच्या विमानात सुसाईड बॉम्बर अर्थात आत्मघातकी हल्लेखोराचा वापर करण्यात आल्याचा संशय राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आ.अमोल मिटकरी यांनी केला आहे. व्हीएसआर कंपनीने गत डिसेंबर महिन्यात आपल्या कंपनीच्या प्रत्येक वैमानिकाचा प्रत्येकी ५० कोटी रुपयांचा विमा उतरविला होता. जर ५० कोटींचा विमा उतरविला गेला असेल आणि जो पायलट ऐनवेळी बदलण्यात आला आणि त्याला हिप्नोटाईज पान २ वर



## एवढा संशय असेल तर खाजगी गुप्तचर यंत्रणेमार्फत चौकशी करा

जगात मोठमोठ्या खाजगी गुप्तचर यंत्रणा आहेत ज्या कोणत्याही विषयांमध्ये, प्रकरणांमध्ये जाऊन चौकशी करु शकतात. खरचंच दादांचा मृत्यू संशयास्पद असेल तर या गुप्तचर यंत्रणांमार्फत चौकशी करायला हरकत नाही. सरकारी यंत्रणेचा तपासाचा अहवाल जो येईल तो येईल परंतु खाजगी चौकशी सुद्धा होऊ शकते, जे नाही ते या संदर्भात वेगवेगळे सनसनाटी विधाने करीत आहेत, त्यांनी स्वत: पुढाकार घेऊन एखाद्या खाजगी एजन्सीकडे जावे म्हणजे सत्य बाहेर येईल, अशा प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

# पुढचा चंपावती महोत्सव बीडच्या अद्यावत नाट्य गृहात होईल



## आ.विजयसिंह पंडीत यांची ग्वाही

बीड (प्रतिनिधी) : कलेचं महावैभव लाभलेल्या बीड जिल्ह्यात नव कलाकारांची सुजाण पिढी घडवण्याचं महत्त्वाचं काम चंपावती महोत्सव करत आहे. आजवर नाट्यगृहातील सुविधांच्या अभावामुळे कलाकारांना मोठा छळ सहन करावा लागला. मात्र आता नाट्यगृहाच्या दुरुस्ती व अद्ययावत सुविधांसाठी साडेआठ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून कलाकारांच्या हक्काच्या नाट्यगृहाचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलणार आहे. पुढील चंपावती महोत्सव अद्यावत नाट्यगृहातच उभा राहील, अशी ग्वाही राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते आमदार विजयसिंह पंडित यांनी दिली आणि चंपावती महोत्सव अविरत टिकविण्यासाठी आम्ही सर्व पुढाकार घेऊ असे प्रतिपादन दिले.

### कलाकारांच्या मागण्या पूर्ण करणे ही आता आपली सामूहिक जबाबदारी- अनिलदादा जगताप

काल दिनांक ८ फेब्रुवारी २०२० रोजी अनिलदादा जगताप फाउंडेशन आणि शिवसेना बीड आयोजित चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेअंतर्गत इंग्रजी माध्यमातील पान २ वर

### बीड नाट्यगृह दुरुस्तीसाठी साडेआठ कोटींचा निधी; एकही रुपया वाया जाणार नाही-विनोद मुळूक

बीड नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष विनोद मुळूक यांनी नाट्यगृहाच्या दुरुस्तीसाठी सातत्याने पाठपुरावा करून साडेआठ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणल्याची माहिती दिली. हा निधी पूर्णपणे कलाकारांच्या नाट्यगृहाच्या दुरुस्ती व अद्ययावत सुविधांसाठीच वापरण्यात येणार असून त्यातील एकही रुपया वाया घालवला जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. पान २ वर

## ब्रँडेड स्कॉच, आयरिश व्हिस्की स्वस्त होणार

नवी दिल्ली दि.८ (वृत्तसेवा):- भारतानं जागतिक व्यापार क्षेत्रात दोन मोठे निर्णय घेतले आहेत. या महत्वाच्या निर्णयांमुळे देशातील मद्यप्रेमी आणि बार व्यावसायिकांसाठी दिलासादायक ठरण्याची शक्यता आहे. आनंदाची बातमी समोर आली आहे. केंद्र सरकारनं युरोपियन युनियन आणि अमेरिका या जगातील दोन सर्वात मोठ्या बाजारपेठांशी ऐतिहासिक व्यापार केलेले आहेत.

केंद्र सरकारने केलेल्या करारामुळे परदेशी ब्रँडेड मद्य आता सर्वसामान्यांच्या खिशाला परवडणाऱ्या दरात उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

# उद्योजकांना त्रास देणाऱ्यांना ठोकून काढू

## मुख्यमंत्री फडणवीसांचा भरसभेत कडक इशारा



अहिल्यानगर (प्रतिनिधी): राज्यात उद्योगांचे विकेंद्रीकरण वेगाने सुरू असताना औद्योगिक क्षेत्रातील झुंडशाही, गुंडशाही आणि उद्योजकांना त्रास देणाऱ्या प्रवृत्ती अजिबात खपवून घेतल्या जाणार नाहीत. सुपा औद्योगिक क्षेत्रात उद्योजकांना त्रास देणारे काही वाईट उद्योग सुरू असल्याची माहिती मिळाली असून, अशा घटकांना कायद्याने ठोकून काढले जाईल, असा ठाम आणि स्पष्ट इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला. अहिल्यानगर-पुणे महामार्गावरील सुपा (ता.पारनेर) औद्योगिक क्षेत्रातील खाजगी औद्योगिक प्रकल्पाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधान

# सभापती शेख निजाम यांनी उद्या बोलाविली बैठक



**बीड दि.८ (प्रतिनिधी):- येथील नगर पालिकेचे स्वच्छता व आरोग्य सभापती शेख निजाम यांनी उद्या दि.१० फेब्रुवारी रोजी सकाळी ११.३० वाजता नगर परिषदेच्या मुख्य कार्यालयात बैठक बोलाविली आहे. या बैठकीत स्वच्छतेच्या अनुषंगाने १४ ते १५ मुद्दे हाताळण्यात येणार आहेत. शहरातील स्वच्छतेसह डम्पींग ग्राऊंडपर्यंत विविध मुद्यांवर यामध्ये चर्चा करण्यात येणार आहे.**

बीड नगर पालिकेतील स्वच्छता वैद्यक व आरोग्य समितीची सभा उद्या दि.१० फेब्रुवारी रोजी बोलाविण्यात आली आहे. या सभेत शहरातील स्वच्छतेच्या कामांचे नियोजन करणे, विशेष स्वच्छता मोहिम राबविणे, प्रभागनिहाय स्वच्छता कामकाजाचे, वाहनांचे नियोजन करणे, घंटागाडीच्या फेऱ्या वाढविणे तसेच सकाळी व संध्याकाळचे वेळापत्रक नागरिकांना कळविणे, सफाई कामगार वाढविणे व त्यांना ओळखपत्र, ड्रेसकोड देणे, ट्रॅक्टर आणि घंटागाड्यांना जीपीएस बसविणे, कॉम्प्क्टरची संख्या वाढविणे, त्यानंतर डम्पींग ग्राऊंड यासह इतरही मुद्यांवर या सभेत चर्चा होणार असल्याचे सांगण्यात येते.

## डम्पींग ग्राऊंडपेक्षा आधी शहरातील स्वच्छता महत्वाची



नगर पालिकेचे स्वच्छता सभापती शेख निजाम यांनी डम्पींग ग्राऊंडपेक्षा शहरातील स्वच्छतेला महत्व देणे आवश्यक आहे. शहरात आजही ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग पडले आहेत. नाल्या तुंबलेल्या आहेत. काही ठिकाणी सिमेंट रोडवरच उकांडा झालाय त्यामुळे आधी शहरातील कचरा बाहेर काढणे आवश्यक आहे त्यासाठी त्यावरच लक्ष केंद्रीत होणे महत्वाचे आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत अज्ञात व्यक्तीचा मृत्यू

## पाडळशिंगी टोल नाक्याजवळील घटना, मदतीला कोणीच नाही

बीड दि.८ (प्रतिनिधी):- धुळे-सोलापूर महामार्गावरील पाडळशिंगी टोलनाक्यापासून अवघ्या काही अंतरावर अज्ञात वाहनाने



दिलेल्या धडकेत एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला. ही घटना शनिवार, दि. ८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास घडली. अपघात इतका भीषण होता की, तो इसम जागेवरच ठार झाला. घटनास्थळ टोल नाक्याच्या अगदी जवळ असतानाही तेथील कर्मचाऱ्यांकडून, प्रवाशाकडून किंवा स्थानिक रहिवाशी कोणतीही तत्पर मदत मिळाली नसल्याचा आरोप प्रत्यक्षदर्शींकडून केला जात आहे. अपघातानंतर बराच वेळ जखमी व्यक्ती रस्त्यावर पडून होती, मात्र उपचारासाठी पुढाकार घेतला गेला नाही, असे सांगितले जात आहे. महामार्गावर उपलब्ध असलेली रुग्णवाहिका सेवाही वेळेत पोहोचली नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे. मृत व्यक्तीची अद्याप ओळख नसल्याचे देखील माहिती मिळत आहे दरम्यान, बीड येथील स्व. अमोलभैया गलधरी युवा मंचाच्या कार्यकर्ते सुदर्शन काळे यांनी घटनास्थळी धाव घेत व घडलेल्या घटना बाबत संताप व्यक्त करत त्यांनी सोशल पान २ वर

# वैजनाथ दर्शन बारी मंडपाचे काम रखडलेलेच

## महाशिवरात्रीला भाविकांच्या रांगा उत्तर पायऱ्यांवरच लागणार, ४ वर्षांपासून काम जैसे थेच

बीड दि.८ (प्रतिनिधी):- येत्या १५ फेब्रुवारी रोजी देशभरात महाशिवरात्री मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. या दिवशी भाविक बीड जिल्ह्यातील परळीतील वैजनाथ मंदिरात मोठ्या प्रमाणात गर्दी करतात. परंतु, वैजनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील दर्शन बारी मंडपांचे काम गेल्या ४ वर्षांपासून रखडल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे यंदाच्या महाशिवरात्रीला वैजनाथ मंदिराच्या उत्तर पायऱ्यांवरच भाविकांच्या रांगा लागणार आहेत. परळीतील वैजनाथ मंदिर परिसरात चार वर्षांपूर्वी वैजनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून साधारण २० कोटी रुपये खर्च करून दर्शन बारी मंडपाच्या बांधकामाला सुरुवात झाली होती. त्यावेळी ही इमारत दीड वर्षात होणे अपेक्षित होते. परंतु, असे असतानाही चार वर्षे उलटूनही दर्शन बारी मंडपाचे काम रखडलेले आहे. त्यामुळे यंदाच्या महाशिवरात्रीलाही भाविकांना उत्तर पायऱ्यांवरच रांग लावावी लागणार आहे.



दरम्यान, कोट्यवधी रुपये खर्च करूनही दर्शन बारी मंडपाचे काम रखडल्याने भाविकांची गैरसोय होणार आहे. तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील रखडलेल्या या दर्शन बारी मंडपांचे काम कधी पूर्ण होणार पान २ वर

**पाहिजेत**
2 रिसेप्शनिष्ट
3 साफसफाई कर्मचारी (रुम सर्व्हीस)
गरजुंनी संपर्क करावा.
: भेटण्याची वेळ :
दु.12.00 ते 4.00
हॉटेल साई पॅलेस
जालना रोड, बीड.
16534-13445




# नंदकुमार महाराजांच्या एकसष्टी निमित्त आयोजित रामकथेचा समारोप

बीड (प्रतिनिधी) : श्रीरामचंद्राच्या पवित्र चरित्राचे श्रवण व्हावे या उद्देशाने रामदासी, शिष्य परिवाराने नंदकुमार महाराजाचां एकसष्टीचा उत्सव सर्वांच्या तृप्ततेसाठी मोठ्या उत्साहात साजरा केला. रामकथा ह भ प विशाल महाराजांची ,हा तर पाच दिवस चाललेला हा ज्ञानयज्ञ. काल्याचे किर्तन ज्यांची एकसष्टी साजरी होत आहे त्यांचे सुपुत्र ह भ प कृष्णा महाराज रामदासी यांचे. हा अमृतयोग ह भ प नंदकुमार रामदासी यांच्या सात्विक, तपस्वी, रामदासी पुण्याईने बीडमध्ये घडला. स्वामीनारायण संस्थाचे प्रमुख महामोहोपाद्याय प पू भद्रेशदास स्वामी महाराजांनी कृष्णा महाराजांच्या वैदिक गुणवत्तेचा मोठा आदर ठेवून संस्थांच्या वतीने नाशिकचे साधू सुबोध सागरदास महाराज यांची उपस्थिती पान २ वर

# सेमीकँडक्टर बनविण्यात भारताला मोठे यश

बंगळुरू : भारताच्या सेमीकँडक्टर मोहिमेला आज एक मोठे यश मिळाले आहे. अमेरिकन चिप निर्माता कँपनी क्वालकॉमने भारतात विकसित केलेल्या आपल्या पहिल्या २ नॅनोमीटर सेमीकँडक्टर चिपचे टेप-आउट यशस्वीपणे पूर्ण केले आहे. केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री आश्वनी वैष्णव यांनी बेंगळुरू येथील क्वालकॉमच्या केंद्राला भेट दिली आणि भारताच्या या तांत्रिक प्रगतीचे कौतुक केले. टेप-आउट हा चिप डिझाइनिंग प्रक्रियेतील अंतिम टप्पा असतो, ज्यानंतर ती प्रत्यक्ष उत्पादनासाठी पाठवली जाते. ही २ नॅनोमीटर चिप जगातील सर्वात प्रगत तंत्रज्ञानापैकी एक आहे. या छोट्याशा चिपमध्ये सुमारे २० ते ३० अब्ज ट्रान्झिस्टर्स बसवण्यात आले आहेत.

# हर हर महादेव !

# धाकटी अलंकापुरी महाशिवरात्र महामहोत्सवासाठी झाली सज्ज

शिरूर कासार दि.८(प्रतिक भांडेकर):- हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या व सातशे वर्षाहून अधिक पुरातन हेमाडपंथी सिध्देश्वर मंदिर असलेली धाकटी अलंकापुरी महाशिवरात्र महा महोत्सवा साठी सज्ज झाली असुन पंचक्रोशितील गावांना निमंत्रण व भिक्षा आता अंतिम टप्यात आली असुन भव्य मंडप उभारणीचे काम सुरू झाले आहे.

वै.ब्रम्हलिन संत आबादेव महाराज यांनी प्रारंभ केलेला आणि पुढे महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांनी एका उंचीवर नेलेला महाशिवरात्र सोहळा अवघ्या चार पांच दिवसावर येऊन ठेपलेला असुन सोमवार दि.९ पासुन हा सोहळा कांदिवली आश्रमाचे स्वामी विवेकानंद गिरी यांचे अध्यक्षतेखाली व विवेक महाराज शास्त्री यांचे उपस्थितीत हा सोहळा अध्यात्मिक



वैभवसंपन्न होणार असुन त्याची तयारी आता अंतिम टप्प्यात आलेली आहे.शिरूरसह पंचक्रोशितील जवळपास पंचवीस गावांना निमंत्रण व त्यांची भिक्षा ही परपंरा तितक्याच भावनेतून सांभाळली जात आहे .रोख स्वरूपातील योगदानाबरोबर पंचक्रोशी अन्नदानात देखील मोलाचा वाटा उचलतात .प्रामुख्याने आनंदगांव ,कान्होबाची वाडी ,झापेवाडी ,कोळवाडी ,बावी ,तागडगांव ,पाडळी , ढोकवड , दहिवंडी ,उत्तमनगर ,नागरेवाडी ,वार्णी ,लोणी ,मांगेवाडी ,राक्षसभुवन, विघनवाडी ,व्हरकटवाडी या तालुक्यातील गावाबरोबर पाथर्डी तालुक्यातील भालगांव ,भगवान नगर ,कासळवाडी ,एकनाथ वाडी या गावचाही योगदानात सहभाग असतो. सप्ताह काळात निवास व भोजन व्यवस्थेवर विशेष लक्ष केंद्रित केले गेले असुन भाविकांची गैरसोय होणार याची दक्षता घेतली जाणार आहे. महाशिवरात्र महासोहळ्यासाठी सर्वांनी मोठ्या संखेने उपस्थित राहून तन मन धनाने संस्थानला सहकार्य करावे असे आवाहन महंत स्वामी विवेकानंद गिरीजी व घोषीत उत्तराधिकारी विवेक शास्त्री महाराज यांनी केले आहे.

# थकीत देयके निकाली काढा-आत्माराम वाव्हळ

बीड दि.८(प्रतिनिधी): मागिल काही वर्षांपासून प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी बांधवांचे थकीत देयके निधी अभावी शासनाने निकाली काढले नाहीत. या थकीत बिलासाठी तत्काळ निधी उपलब्ध करून देत थकित बिले लवकरच म्हणजे या वर्षी निकाली काढावेत अशी मागणी विना अनुदानित शाळा कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून केली आहे.
या बाबत अधिक माहिती अशी की बीड जिल्ह्यात गेल्या पाच ते सहा वर्षापासून प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी बांधवांचे थकीत देयके बाकी आहेत. वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप ही थकित देयके शासनाने निकाली काढले नाही, दरवर्षी थकीत बिल टाकले जाते सन २०२४-२५ मध्ये डायरेक्टर लेवलला गेलेले परंतु निधी अभावी बरेच बिले रिजेक्ट करण्यात आले, परत थकीत बिल टाकण्यासाठी सूचना दिल्या, सन २०२५-२६ मध्ये पुन्हा एकदा थकीत देयके सादर केली परंतु संपूर्ण महाराष्ट्रात बऱ्याच कर्मचाऱ्यांचे थकीत देयके बाकी आहेत. सर्व कर्मचाऱ्यांनी वेतन पथक कार्यालयात थकीत देयके सादर केले, संबंधित कार्यालय थकीत देयके चेक करून पुढे पाठवणार आहे, परंतु त्यांना कालावधी कमी असल्यामुळे आम्हाला आमचे बिल रिजेक्ट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शासनाने महाराष्ट्रातील वेतन पथक कार्यालयाला बिल चेक करण्यासाठी जास्त (वेळ) कालावधी द्यावा जेणेकरून सर्व कर्मचाऱ्यांचे बिल व्यवस्थित चेक करून पुढे पाठवले जाईल, सर्व थकीत देयके शासनाने याच वर्षात निकाली काढावे. त्या साठी लागणारा पुरेसा निधी उपलब्ध करून देत या वर्षात या हेडचे संपूर्ण थकीत देयके निकाली काढावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून केली आहे.

# गंगामसला सर्कलमध्ये 'शेकाप'चा एल्गार ; भाई मुंजा पांचाळ यांच्या दौऱ्याला रोशनपुरीत मोठा प्रतिसाद

माजलगाव दि.८ (प्रतिनिधी)- आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिति निवडणुकीच्या पार्श्वभूमी वरॲड.भाई नारायण गोले पाटील बीड जिल्हा चिटणीस यांच्या मार्गदर्शनाखाली (शेकाप) चे भाई मुंजा पांचाळ बीड जिल्हा चिटणीस मंडळ सदस्य माजलगाव तालुका चिटणीस यांनी गंगामसला सर्कलमध्ये आपला जनसंपर्क दौरा तीव्र केला आहे. या दौऱ्यांतर्गत रोशनपुरी येथे पोहोचलेल्या भाई पांचाळ यांचे ग्रामस्थांनी उत्साहात स्वागत केले असून, त्यांच्या उमेदवारीला मोठा कौल मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे. लाल बावटा आणि शेतकऱ्यांचे प्रश्न शेतकरी कामगार पक्षाची बांधणी मजबूत करण्यासाठी आणि स्थानिक प्रश्न ऐरणीवर आणण्या साठी भाई मुंजा पांचाळ सध्या सर्कल पिंजून काढत आहेत. रोशनपुरी येथे झालेल्या बैठकीत त्यांनी शेतकरी, कष्टकरी आणि शेतमजुरांच्या प्रश्नांवर प्रखर भाष्य केले. लाल बावट्याचा विचार हाच सर्वसामान्यांचा आधार आहे, असे म्हणत त्यांनी आगामी निवडणुकीत शेकापची ताकद दाखवून देण्याचे आवाहन केले.रोशनपुरीच्या ग्रामस्थांनी भाई मुंजा पांचाळ यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत केले. यावेळी ग्रामस्थांशी चर्चा करताना मुंजा पांचाळ यांनी स्थानिक रस्ते, सिंचन आणि प्रशासकीय कामांमधील अडथळ्यांवर बोट ठेवले. पक्षाच्या ध्येयधोरणांवर विश्वास ठेवून रोशनपुरीतील युवकांनी आणि ज्येष्ठ नागरिकांनी या दौऱ्यात सक्रिय सहभाग नोंदवला. यावेळी उपस्थित जिल्हा परिषद गंगामसला सर्कल मधील रोशन पुरी येथील ग्रामस्थ बाजीराव ताकट, बाळासाहेब टेकाळे, तुळशीदास ताकट, सुखदेव ताकट, कृष्णा डोने, बिबीशन भोसले, भागवत ताकट, राजेभाऊ शेरकर, व इतर नागरिकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला.



# माजलगाव वकील संघात माता रमाई जयंती उत्साहात साजरी

माजलगाव दि ८ (प्रतिनिधी)- येथील वकील संघाच्या वतीने त्यागमूर्ती माता रमाई यांची जयंती दि.७ फेब्रुवारी शनिवार रोजी साजरी करण्यात आली.या कार्यक्रमात माता रमाई यांच्या जिवनाविषयी सिनियरॲड..व्ही.जी. तिडके, ॲड.एम.ए.डोंगरदिवे,ॲड. शिंदे, ॲड.जाधव यांनी मनोगत व्यक्त केले.

तसेच ॲड.सीमा उजगरे/जाधव मॅडम,ॲड.बि. एस घनघाव यांनी रमाईचे गीत गाऊन अभिवादन केले.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन



वकील संघाचे सचिव ॲड. नारायण तेलगड यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार उपाध्यक्ष ॲड.जाधव यांनी मानले कार्यक्रमासाठी वकील संघातील ड.जोशी, ॲड.गजमल, ॲड.शर्मा,ॲड.खळगे, ॲड.विजय मस्के,ॲड.नाईकवाडे, ॲड.हिंगणे,ॲड. सातपुते, ॲड.सोळंके, ॲड.गरड, ॲड.टाकणखार तसेच यावेळी वकील संघातील महिला सदस्य ॲड. गाडेकर, ॲड.वडमारे, ॲड.भोसले,ॲड.बागल,ॲड.राठोड यांच्या सह आदी सदस्य उपस्थित होते.

# पंचशिल बुद्ध विहार विश्वनाथ नगर नांदेड येथे त्यागमूर्ती माता रमाई जयंती मोठ्या उत्साहात साजरी

नांदेड - भीम क्रांती महिला मंडळाच्यावतीने पंचशिल बुद्ध विहार विश्वनाथ नगर (हनुमान गड स्थीत) नांदेड येथे दि.७ फेब्रुवारी २०२६ शनिवार रोजी सकाळी ठिक ११ वाजता त्यागमूर्ती, महासुर्याची सावली, महामानवाच्या उर्जा स्त्रोत, कारूण्यमुर्ती, माता रमाबाई भिमराव आंबेडकर यांची १२८ वी जयंती मोठ्या हर्षोउल्हासात साजरी करण्यात आली.सर्वप्रथम सामाजिक कार्यकर्ते मुरलीधर पाईकराव यांया हस्ते त्यागमूर्ती माता रमाई यांच्या प्रतिमेचे पुजन करून पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तद्नंतर लगेचच त्रिशरण पंचशिल बुद्ध धम्म वंदना सामुहिकरित्या घेण्यात आली.यावेळी या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून माजी एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच.मिसलवाड, मुरलीधर पाईकराव, केशव शितळे, बबनराव पाईकराव, प्रितम ढगे, भिमक्रांती महिला मंडळाच्या सर्व उपासिका, पदाधिकारी, कार्यकर्ते यांची प्रमुख उपस्थिती होती.

पान १ वरून

## दादांच्या अपघाती मृत्यूचे राजकारण करू लागले

केले होते का ? त्याला आमिष दाखविण्यात आले होते का ? अनेक ठिकाणी हिप्नोटाईज करुन सुसाईड बॉम्बरचा वापर केला जातो असे मिटकरी यांनी सांगितले. संजय राऊत म्हणाले की, अजितदादांच्या सोबत प्रवासात भाजपमधील घोटाळ्यांच्या फाईली होत्या. अजितदादा सिंचन घोटाळ्याच्या संदर्भात बोललेले होते. त्यामुळे त्यांच्या मृत्युवर संशय व्यक्त होत आहे. दररोज हे दोन तीन नेते दादांच्या मृत्यू संदर्भात वेगवेगळे वक्तव्य करुन सनसनाटी निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. राष्ट्रवादीचे अध्यक्ष आणि अजितदादांचे काका शरद पवार यांनी स्वत: ज्या दिवशी अपघात झाला त्याच दिवशी यावर भाष्य केले होते. शरद पवार म्हणाले होते, मी आज मीडियासमोर येणार नव्हतो पण काही माध्यमांमध्ये या अपघातामागे काही राजकारण आहे अशा प्रकारची भूमिका मांडली गेल्याचं कळलं, पण यात राजकारण नाही, हा निव्वळ अपघात आहे. या मृत्युच्या यातना महाराष्ट्राला, आम्हा सगळ्यांना आहेत कृपया यामध्ये राजकारण आणू नये असे स्पष्ट केले होते.

## पुढचा चंपावती महोत्सव बीडच्या अद्यावत

समूह नृत्य, जोडी नृत्य व एकपात्री अभिनय स्पर्धेचा भव्य उद्घाटन सोहळा राष्ट्रवादीचे नेते आमदार विजयसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी बीड नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, राष्ट्रवादीचे गटनेते फारुख पटेल, शिवसेनेचे नगरसेवक व बांधकाम सभापती संजय उडान, राष्ट्रवादीचे स्वच्छता सभापती शेख निजाम, बाळासाहेब गुंजाळ, नगरसेविका रेशमा सरवदे, मोमीन सीमा परवीन, नगरसेवक जैतुल्ला खान, सीता मोरे, भैय्यासाहेब मोरे, महंमद नुझहत आरा मुनिरुद्दीन, शेख अशफाक शेख इशाक, मनोज गोडसे, शिवसेनेचे नगरसेवक सूरज चुंगडे, शितल चक्रे, एमआयएमचे नगरसेवक सय्यद इलियाज हमीद, नगरसेवक दिनेश मुंदडा, भीमराव वाघचौरे, रणजित बनसोडे, प्रमोद शिंदे तसेच शिवसेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्व मान्यवरांचे स्वागत व सत्कार शिवसेनेच्या वतीने करण्यात आले.

उद्घाटन सोहळ्याचे प्रास्ताविक चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतीक कांबळे यांनी केले. याबरोबरच बीड नाट्यगृहाच्या नूतनीकरणास तात्काळ सुरुवात व्हावी, हे नूतनीकरण कलाकारांच्या देखरेखीखाली पार पडावे. तसेच अद्यावत नाट्यगृहात केवळ संस्कृतीक कार्यक्रमच व्हावेत. अशी इच्छा बीड कलाकारांच्या वतीने व्यक्त केली. कलाकारांच्या यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी कलाकारांच्या मागण्या पूर्ण करणे ही आता आपली सामूहिक जबाबदारी असून कलाकारांच्या कलागुणांना समृद्ध करणारा चंपावती महोत्सव अविरत सुरू राहील, असा विश्वास व्यक्त केला. राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते फारुख पटेल यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप व कलावंत प्रतीक कांबळे यांनी बालकलाकारांसाठी सुरू केलेला चंपावती महोत्सव आज बीड जिल्ह्याची मोठी सांस्कृतिक चळवळ व कला क्षेत्राची भावना बनल्याचे सांगत शुभेच्छा दिल्या.

## बीड नाट्यगृह दुरुस्तीसाठी साडेआठ कोटींचा

या निधीचा पारदर्शक वापर केला जाईल तसेच संपूर्ण खर्चाचा हिशोब नागरिकांसमोर मांडण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या या ठाम भूमिकेचे उपस्थित कलाकार व रसिक श्रोत्यांनी जोरदार टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत करत समाधान व्यक्त केले.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत अज्ञात व्यक्तीचा मृत्यू

मीडियावर थेट प्रक्षेपण करत परिस्थिती दाखवून दिली. या लाईव्हमधून टोल कर्मचाऱ्यांनी मदतीसाठी हालचाल केली नाही, असा आरोप करण्यात आला आहे. हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून नागरिकांमधून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.
टोलनाक्यावरून दररोज लाखो रुपयांची वसुली केली जाते ; मात्र आपत्कालीन प्रसंगी प्रवाशांना मदत देण्याची जबाबदारी कोणाची, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. या प्रकरणी संबंधित यंत्रणांनी सखोल चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## वैजनाथ दर्शन बारी मंडपाचे काम रखडलेलेच

याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. वैजनाथ मंदिरातील गर्दी वाढल्यास उत्तर पायऱ्यांवर भाविकांच्या रांगा लावण्यात येतात. भाविकांच्या या रांग दर्शन बारी मंडपातून लावण्यात येणार होत्या. त्यासाठी वैजनाथ तीर्थक्षेत्र आराखड्यातून दर्शन बारी मंडप उभारण्यात आला. यात एकूण चार मजले, अद्ययावत लिफ्ट अशी या दर्शन बारी मंडपाची रचना करण्यात आलेली आहे. दर्शन मंडपात एकाच वेळी साधारण २५ हजार भाविक रांगेत राहू शकतात.

## नंदकुमार महाराजांच्या एकसष्टी निमित्त आयोजित

दिली. माणुसकी तयार होण्यासाठी कोणती औषधी उपलब्ध नाही तर भगवंत आणि संत सानिध्याने तयार होते .जगावं कसं हे रामायण दाखवते, पारिवारिक एकता शिकवते, हनुमंतराय सेवा, भक्ती, एकनिष्ठता कशी असावी ? हे दाखवतात. सतत जागृत होऊन देवभक्ती ,देशभक्ती करावी हाच एकसष्टी पूर्तीचा उद्देश या कार्यक्रमाचा असून तो लक्षात घ्यावा असा संदेश आणि आशीर्वाद स्वामीनारायण संस्थेचे यावेळी प्राप्त झाले.

यथासांग मंत्रोच्चाराच्या गजरात श्री नंदकुमार महाराजांची ग्रंथ तुला शिष्य आणि परिवाराच्या वतीने यावेळी करण्यात आली. दासबोध आणि समर्थांची ग्रंथ संपदा भेट स्वरूपात देण्यात आले .उपजोनियां पुढची येऊं, काला खाऊं दहीभात, या जगद्गुरु तुकोबांच्या अभंगाचे निरूपण आणि भूमंडळी काल्या चे महत्व, गोपाल कृष्णाच्या बाल वयातील देवत्वाचा चमत्कार यातून मौलिक संदेश काल्याच्या कीर्तनात ह भ प कृष्णा महाराज रामदासी यांनी दिला. या परिवारावर प्रेम करणारी मंडळी, शिष्य गण, रामभक्त, माता भगिनी, भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते .

पाच दिवस सुरू असलेल्या या ज्ञानयज्ञाने उपस्थितितांची तृप्ती झाली असाच भाव दिसून येत होता .

## उद्योजकांना त्रास देणाऱ्यांना ठोकून काढू

परिषदेचे सभापती राम शिंदे, आमदार काशिनाथ दाते, आमदार बबनराव पाचपुते, हभप नामदेवशास्त्री, हभप महंत शिवाजी महाराज आदी मान्यवर उपस्थित होते.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पारनेरसारख्या भागात नवे औद्योगिक इकोसिस्टिम उभे राहत असताना जसे चांगले लोक येतात, तसे काही वाईट लोकही तयार होतात. उद्योजकांना धमकावणे, अडथळे निर्माण करणे, खंडणीसारखे प्रकार करण्याचे प्रयत्न होत असल्याचे निदर्शनास आले आहे. यापूर्वी अशा लोकांचा बंदोबस्त केला असून, आता पुन्हा कोणी हिम्मत केली तर त्याला स्पेअर केले जाणार नाही. इज ऑफ डूइंग बिझनेस कॉस्ट ऑफ डूइंग बिझनेस आणि कायदा-सुव्यवस्था या तीन गोष्टी उद्योगाच्या यशासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. मुख्यमंत्री म्हणाले की, पुढील पाच वर्षे औद्योगिक विजेचे दर वाढणार नाहीत ; उलट ते कसे कमी होतील यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. लॉजिस्टिक्स खर्च कमी करण्यावरही भर दिला जात आहे.

पान ६ वरून

## ॲड.जयराम सजगणे यांना मातृशोक

मान्यवर मंडळी तसेच डॉक्टर,वकील, इंजिनिअर,प्राध्यापक, पत्रकार,शिक्षक, व्यापारी, शेतकरी यांची उपस्थिती होती. त्या अतिशय कष्टाळू आणि प्रेमळ स्वभावाच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले तीन मुली सुना, जावाई,नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या दु:खात दैनिक पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे.

## पाटोदा सार्वजनिक शिवजयंती उत्सव

आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. त्यानंतर भव्य शोभायात्रा व मिरवणूक काढण्यात येणार असून ढोल-ताशे, लेझीम, पारंपरिक वेशभूषा, अश्वारूढ सादरीकरण, तलवारबाजी व विविध पारंपरिक वाद्यांच्या गजरात शिवजन्मोत्सव साजरा केला जाणार आहे. या शिवजन्मोत्सवाच्या माध्यमातून पाटोदा शहरात सामाजिक ऐक्य, सांस्कृतिक जपणूक आणि नव्या पिढीत शिवविचार रुजवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. सर्व माहिती शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष संतोष जाधव यांनी दिली असून शिवभक्तांनी व शिवप्रेमींनी या सर्व कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती पाटोदा यांच्यावतीने करण्यात आले आहे.

## गण गण गणात बोते.. जय श्री गजानन

होते.विदर्भाची पंढरी असलेल्या श्री क्षेत्र शेगांव येथील संत गजानन महाराजांचा रविवार दि.८ फेब्रुवारी रोजी प्रकट दिन असल्याने शहरातील संत गजानन महाराज मंदिरात सकाळी ८ वाजता अभिषेक होवून दुपारी १२ वाजता हजारो भाविकांच्या उपस्थितीत महाआरती होवुन शेकडो भावीक भक्तांनी संत श्री गजानन महाराज की जय,गण गण गणात बोते च्या जयघोषात 'श्रीं'चे दर्शन घेवुन महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी संत गजानन महाराज सेवा समितीच्या सदस्यांसह भक्तगण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बकरवाडी येथे 'आदर्श शिक्षक पुरस्कार'

बोलताना वक्त्यांनी स्व. बबनराव मस्के सरांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मार्गदर्शनाचा दिवा आहेत. अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या. केवळ कार्यक्रम न घेता, सामाजिक बांधिलकी जपत मस्के परिवाराच्या वतीने जि.प.प्राथमिक शाळा बकरवाडी येथे शालेय कपाट भेट देण्यात आले. या दातृत्वाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.या सोहळ्याचे नेटके आयोजन चि.पवनराज बबनराव मस्के, चि. गणेश बबनराव मस्के, रवींद्र मस्के व समस्त मस्के परिवार यांच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाला ग्रामस्थ, पालक, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते तौरल इंडिया

त्याला सक्षम पर्याय देशातच निर्माण करणे ही काळाची गरज आहे. परदेशातून आयात कराव्या लागणाऱ्या गोष्टी आता भारतात व विशेषत: महाराष्ट्रात भरत गीते यांच्यासारख्या उद्योजकांमुळे तयार होत आहेत, ही अभिमानाची बाब आहे.राज्याच्या औद्योगिक प्रगतीचा समतोल राखण्यावर शासनाचा भर आहे. पूर्वी राज्याची औद्योगिक प्रगती केवळ मुंबई, एमएमआर व पुणे या भागांपुरती मर्यादित होती. ती विकेंद्रित करून राज्याच्या सर्व भागांत पोहोचविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. सुपा एमआयडीसी हे त्याचेच एक उत्तम उदाहरण आहे. केवळ सामंजस्य करार करून न थांबता, ते प्रत्यक्षात आणण्यासाठी उद्योग विभाग तत्परतेने काम करत आहे. दावोसमध्ये २०२५ मध्ये करण्यात आलेला करार अत्यंत वेगाने प्रत्यक्षात आला आहे.केवळ उद्योग उभारणे पुरेसे नाही, तर ते पर्यावरणपूरक असणे आवश्यक आहे. या प्रकल्पात 'सस्टेनेबल कास्टिंग' व 'रिसायकलिंग'वर भर देण्यात आला असून, राज्यात 'उद्योग व पर्यावरण' हातात हात घालून पुढे जातील, असा विश्वास आहे. हेलिकॉप्टर, जहाजे आणि रस्ते बांधणीसाठी लागणारे अद्ययावत भाग आता अहिल्यानगरमध्ये तयार होत आहेत, ही अहिल्यानगर जिल्ह्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.याप्रसंगी माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री राधाकृष्ण विखे, उद्योग मंत्री उदय सामंत, खासदार भागवत कराड, आमदार काशिनाथ दाते, आमदार सुरेश धस, आमदार विक्रम पाचपुते,श्री क्षेत्र भगवानगडाचे महंत ह.भ.प. महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री. नामदेव महाराज शास्त्री, श्री क्षेत्र नारायणगडाचे महंत ह.भ.प शिवाजी महाराज, तौरल इंडियाचे सीईओ उद्योगपती भरत गिते, थोनी ल्युमिनियमचे लोथर थोनी, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ गार्गे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्यासह अनेक मान्यवर, उद्योजक व नागरिक उपस्थित होते.

## भगवानगड व नारायणगडाच्या मठाधिपतींनी कृतीतून

सध्याची सामाजिक व राजकीय परिस्थिती पाहता सामाजिक एकोपा लयाला गेल्याचे अनेक ठिकाणी निदर्शनास आले आहे. यामुळे सामान्य माणूस भ्रमित झालेला आहे. परंतु भ्रमित झालेल्या दोन्ही समाजाला आज भगवानगड व नारायणगडाच्या मठाधिपतींनी एकत्र येण्याचा कृतीतून संदेश दिला आहे. आज तौरल इंडिया प्रकल्पाच्या उदघाटन कार्यक्रमानिमित्त दोन्ही गड एकत्र आल्याने निश्चितच सामाजिक एकता निर्माण होईल अशी चर्चा दोन्ही गडाच्या भक्तांमध्ये सुरु झालेली आहे.

## जिल्ह्यातील सर्व आरोग्य संस्थांमध्ये एकाच वेळी

स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची ठिकाणे तसेच जैववैद्यकीय कचऱ्याची योग्य विल्हेवाट यावर विशेष भर देण्यात आला. आरोग्य अधिकारी, डॉक्टर, परिचारिका, कर्मचारी तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.डॉ. सोळुंके पुढे म्हणाले की, स्वच्छता ही एक दिवसाची मोहीम नसून सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. यासाठी सर्व आरोग्य संस्थांना नियमित स्वच्छता तपासणी, जनजागृती आणि कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.या उपक्रमामुळे रुणांना स्वच्छ व सुरक्षित उपचार सुविधा मिळण्यास मदत होणार असून जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य सेवेची गुणवत्ता अधिक सक्षम होईल, असा विश्वास आरोग्य विभागाने व्यक्त केला आहे.

## मिस्त्रीला अडवून तिघांनी मारहाण करून २० हजारांचा

अशी विचारणा केली. याचाच फायदा घेत त्या तीन तरुणांनी इमरान यांना बाजूला नेले आणि त्यांच्याकडे असलेल्या पैशांची मागणी केली. इमरान यांनी त्यांना सांगितले की, तुम्ही मला ऑनलाईन पैसे पाठवा, मी तुम्हाला रोख रक्कम देतो. या गोष्टीचा राग आल्याने त्या तिघांनी संगनमत करून इमरान यांना चापटाने मारहाण केली. त्यांना धरून ठेवत त्यांच्या खिशातील ८ हजार रुपये रोख आणि १२ हजार रुपये किमतीचा मोबाईल फोन जबरदस्तीने हिसकावून घेतला. एकूण २० हजार रुपयांचा ऐवज चोरून आरोपी तिथून पसार झाले. याप्रकरणी ७ फेब्रुवारी रोजी रात्री उशिरा शेख इमरान दस्तगीर यांनी दिलेल्या तक्रारीवरून तीन अज्ञात आरोपींविरुद्ध अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शिंदे करीत आहेत.

## आयेशा टूर्सच्या शाखेचे दिमाखात उद्घाटन

बीड शहरात ही सुविधा उपलब्ध झाल्यामुळे हज आणि उमरा यात्रेसाठी जाणाऱ्या नागरिकांची मोठी सोय झाली आहे. आयेशा टूर्सच्या या उपक्रमाचे आणि सेवाभावी वृत्तीचे समाजातील सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## जिल्ह्यातील पन्नास हजार लाडक्या बहिणींना

लाभ पात्र लाभार्थ्यांना मिळावा यासाठी पडताळणी आणि प्रमाणीकरण करण्याचा निर्णय महिला आणि बालविकास विभागाने घेतला होता. त्यासाठी वेबपोर्टलवर ई-केवायसीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. तसेच ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी वेळीवेळी मुदतवाढ दिली गेली. अंतिम मुदतवाढ ३१ डिसेंबर २०२५ अशी होती. या मुदतीत जवळपास १ कोटी ८० लाख लाडक्या बहिणींनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली. मात्र ई-केवायसी करताना लाभार्थ्यांला त्याच्या कुटुंबातील सदस्य नियमित / कायम /कंत्राटी कर्मचारी म्हणून सरकारी विभाग, उपक्रम, मंडळ, भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक स्वराज्य संस्थेत कार्यरत नसावा किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहे किंवा कसे, याबाबतचा पर्याय निवडण्यास सांगण्यात आले होते. जवळपास २६ लाख लाभार्थी महिलांनी नजरचुकीने चुकीचा पर्याय निवडला. त्यामुळे या महिलांना लाभापासून वंचित रहावे लागणार होते. या पार्श्वभूमीवर पर्याय निवडताना केलेली चूक दुरुस्त करण्यासाठी लाभार्थीना ३१ मार्च २०२६ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे. या कालावधीत लाभार्थीना त्यांच्या ई-केवायसीमध्ये सुधारणा करता येईल. तशी सुविधा पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र यापुढे कोणत्याही परिस्थितीत सुधारणा करण्याची संधी दिली जाणार नाही, असे शासनाच्या परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. तरी बीड जिल्ह्यातील लाडक्या बहिणींनी या सुवर्ण संधीचा फायदा घेऊन तसेच दक्षता घेऊन शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर अचूक माहिती भरून केवायसी दुरुस्ती करून घ्यावी असे आवाहन समाजसेवक जे.डी.शाह यांनी केले आहे.

## कडा येथे आजपासुन महाशिवरात्र महोत्सवास प्रारंभ

जागर असे भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. महोत्सवाची सांगता सोमवार, दि. १६ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल यांच्या काल्याच्या कीर्तनाने होईल आणि त्यानंतर महाप्रसादाचे वाटप केले जाईल.या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी महेश गणेश मंडळ, जय हनुमान गणेश मंडळ, श्रीकृष्ण गणेश मंडळ, जय मल्हार गणेश मंडळ, सावता गणेश मंडळ आणि समस्त कडा ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत. या आध्यात्मिक सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन श्री महेश मंदिर ट्रस्ट व आयोजकांनी केले आहे.

## अवैध धंद्यावर माजलगाव शहर पोलीसांची कारवाई

त्यांचे विरुध्द पो. स्टे माजलगाव शहर येथे अनुक्रमे ३०/२०२६ कलम १२(अ) महा. जु.कायदा, व २) २९/२०२६ कलम ६ (ब), २५(३) सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने कायदा प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक नवनित कॉवत साहेब, मा. अप्पर पोलीस अधिक्षक चेतना तिडके मॅडम, उपविभागीय अधिकारी अनिल कटके साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोउपनि संदिप राठोड, पोहवा /असलम शेख, पोशि, महेश चव्हाण, सुनिल गवळी. यांनी केलेली आहे.

## शिरूर तालुक्यात २७ गावांसाठी आठ गावांत मोफत

तपासणी बरोबर पांच लाखापर्यंत मोफत उपचार असलेले आयुष्यमान भारत कार्ड काढून देण्यात येणार असुन आरोग्य शिबीराचा गरजू नागरीकांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे . सुदृढ नागरीक ही देशाची खरी संपत्ती मानली जाते यासाठी निरोगी आयुष्य असणे गरजेचे असले तरी माणसाला विवीध आजार होतातच त्यावर उपचार करणे गरीबांना आवाक्याबाहेर असते यावर सरकारने पांच लाखापर्यंत मोफत उपचार सुविधा उपलब्ध करून दिली आहे त्यासाठी आयुष्यमान भारत कार्ड गरजेचे असल्याने या शिबीराचे माध्यमातून कार्ड काढून मिळणार आहे. शिवाय रक्त तपासणी , रक्तदाब, शुगर, नेत्र तपासणी मोफत होऊन उपचार देखील केले जाणार आहे. नागरीकांच्या सुविधेसाठी वेगवेगळ्या आठ गावात मोफत शिबिराचे आयोजन करण्यात आले असुन यात घाटशिळ पारगांव व श्रीपतवाडी-शुक्रवार दिनांक ६/२/२०२६ ठिकाण घाटशीळ पारगाव, तिंतरवनी, आनंद वाडी, शृंगारवाडी दि.७/२/२०२६ शनिवार, ठिकाण तिंतरवनी, शिरापुर गात, कमलेश्वर धानोरा, दि.९/२/२०२६ सोमवार, ठिकाण शिरापूर गात, माळेगाव, पारगाव दि.१०/२/२०२६ ठिकाण माळेगाव पुनसावी, मारक्यादि, हाजीपु, गाजिपु, दि. १६/२/२०२६ ठिकाण फुल सांगवी, बोरगाव, सावरगाव दिनांक १७/२/२०२६, ठिकाण बोरगाव, उकिरडा, खामकरवाडी, दि. २४/२/२०२६ ठिकाण उकिरडा, निमगाव, नांदेवली राळेसांगवी दि. २६/२/२०२६ ठिकाण निमगाव येथे आयोजित केले आहे. आरोग्य शिबीराचे ठिकाणी सकाळी दहा ते दुपारी एक या वेळेत मोफत आरोग्य तपासणी होणार असुन तालुक्यातील नागरिकांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन भाजपा प्रदेश उपाध्यक्षा व श्रीसाई सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा ॲड.भाग्यश्री ढाकणे यांनी केले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

## दिल्लीत जुन्या वाहनांवर पूर्णपणे बंदी घालण्याची तयारी ?

नवी दिल्ली दि.८ (वृत्तसेवा):- राजधानी दिल्लीमध्ये सर्वात मोठा प्रश्न आहे तो म्हणजे हवेची गुणवत्ता. दिल्ली-एनसीआरमधील हवेच्या दर्जात घसरण होत आहे. यामध्ये आता सरकार जुन्या वाहनांवर कठोर कारवाई करण्याची तयारी करत आहे. कमिशन फॉर एअर कालिटी मॅनेजमेंटने प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी सविस्तर रोडमॅपवर काम सुरू केले आहे. या रोडमॅपमध्ये जुनी BS-I, BS-II आणि BS-III वाहने पूर्णपणे बंद करण्याचा प्रस्ताव समाविष्ट असू शकतो. शिवाय, पुढील पाच वर्षांत रस्त्यांवरून BS-IV वाहने काढून टाकण्याची योजना देखील विचारात घेतली जात आहे. मात्र यामुळे दिल्लीकरांची चिंता वाढली आहे.


# पार्श्वभूमी

दिनांक ९ फेब्रुवारी २०२६ पान -३


## मा.आ.साठेंनी घेतली पवार कुटुंबीयाची भेट

बीड दि ८ (प्रतिनिधी) - राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या अपघाती निधनानंतर केज च माजी आमदार पृथ्वीराज शिवाजीराव साठे यांनी बारामती येथे जावून शरदचंद्र पवार, सुनित्रा (वहिनी) पवार, पार्थ दादा पवार आणि रोहित दादा पवार यांची सांत्वनपर भेट घेतली.
स्व. अजितदादा पवार यांच्या आकस्मिक निधनामुळे दु:खात असलेल्या पवार कुटुंबीयांची भेट घेऊन, या अत्यंत कठीण व वेदनादायी प्रसंगी आम्ही त्यांच्या दु:खात सहभागी आहोत, असा विश्वास व्यक्त केला.स्व. अजितदादा पवार यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो आणि पवार कुटुंबीयांना हे दु:ख सहन करण्याची शक्ती लाभो, अशी म्हणून प्रार्थना देखील केली

# लघुशंकेसाठी कार थांबवताच चोरट्याने चार लाखाचे दागिने लुटले तसे संशयित दरोडेखोरही पकडले पण पुढे काय झाले ?

**केज, दि. ८ (प्रतिनिधी) – एकीकडे अंबाजोगाई येथील व्यापारी श्रीराम सतीश ढगे हे अंबाजोगाई येथून गुरुवारच्या रात्री ११ वाजता आपल्या कारने लोखंडी सावरगाव मार्गे धानोरा खुर्दकडे जात असताना लघुशंका आली म्हणून त्यांनी इस वडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या अंकुर फाट्याजवळ कार थांबवताच जवळच आलेल्या ४ अज्ञात चोरट्यानी त्यांना चाकूचा धाक दाखवून त्यांच्या गळ्यातील सोन्याचे लॉकेट, हाताच्या बोटातील ३ अंगठ्या, १ लॅपटॉप व नगदीरोख १५ हजार रुपये मिळून एकूण ४ लाख १० हजार रुपयाचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली. असे असतानाच युसुफ वडगाव पोलिसांनी दुसऱ्या दिवशीच्या रात्री पाच संशयित दरोडेखोरांना पकडले. पुढील तपासासाठी न्यायालयाकडून चार दिवसाची पोलीस कोठडी देखील मिळवली परंतु या दोन्ही घटनेत पोलिसांनी पुढे काय तपास केला याबाबत ग्रामस्थांमधून विचारणा होऊ लागलेल्या आहेत.**

यासंदर्भात समोर आलेली माहिती अशी की गुरुवार दि ५ फेब्रुवारीच्या रात्री ११ वाजण्याच्या दरम्यान आपल्या कारने श्रीराम सतीश ढगे, ३२ वर्षे हे लोखंडी सावरगाव मार्गे धानोरा खुर्द या गावी जात आसताना त्यांची कार युसुफ वडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत अंकुर फाट्याजवळ गेली आसता त्यांनी लघुशंकेसाठी आपली कार थांबविली. दरम्यान याच वेळी २५ ते ३० वयोगटातील ४ अज्ञात आरोपीनी तेथे येऊन त्यांना चाकूचा धाक दाखवून त्यांच्या गळ्यातील १७ ग्रॅम सोन्याचे लॉकेट, हातातील २० ग्रॅमच्या ३ अंगठ्या, १ लॅपटॉप व नगदी रोख १५ हजार रुपये असा एकूण ४ लाख १० हजार रुपयाचा ऐवज त्यांनी चोरून नेला. शुक्रवारी सकाळी श्रीराम सतीश ढगे यांच्या फिर्यादीवरून ४ अज्ञात चोरट्या विरोधात युसूफ वडगाव पोलिसात गून्हा नोंद करण्यात आला .
या प्रकरणी तातडीने श्वान पथक, ठसे तज्ञ, फॉरेन्सिक लॅब आणि गून्हा अन्वेशण विभागाचे पथकाला घटनास्थळी पाचरण करण्यात आले होते. दरम्यान याच पोलीस ठाण्याच्या हद्दीत सावळेश्वर शिवारातून जाणाऱ्या कळंब, अंबाजोगाई महामार्गावरील सावळेश्वर शिवारात शुक्रवारी पहाटे साडे तीन वाजण्याच्या दरम्यान अंधाराचा फायदा घेवून दरोडा टाकण्याच्या तयारीत असल्याचा संशय घेऊन ५ दरोडेखोराची टोळी युसूफ डगाव पोलिसांनी जेरबंद केली .यात ४ लाखाच्या जुन्या वापरत्या कारसह दरोडा टाकण्याचे साहित्यही यावेळी जप्त करण्यात आले आहे. शुक्रवार दि ६ च्या पहाटे साडे तीन वाजण्याच्या दरम्यान अंबाजोगाईकडे जाणाऱ्या कारला ( एम एच १४ / सी के ७९१७ ) रात्रीच्या गस्तीवर आसलेल्या पथकाने थांबवून विचारपूस केली आसता त्यांच्या बोलण्यातून संशय आल्यामुळे गाडीची झडती घेतली आसता दरोडा टाकण्यासाठी लागणारे साहित्य गाडीत मिळून आले. त्यावरून या कारसह कारमधील महादेव दशरथ काळे, २३ वर्षे, रा कासारखानी ता वाशी, रितेश मच्छिन्द्र काळे, २६ वर्षे, रा केळवाडी ता वाशी, सुरेश नाना शिंदे, २५ वर्षे, रमेश रतन पवार, २१ वर्षे, व बालाजी अंकुश शिंदे, १८ वर्षे, तिघेही रा इंदापूर ता वाशी या ५ दरोडेखोरांना पोलिसांनी ताब्यात घेवून युसुफवडगाव पोलीस ठाण्यात आणले. या प्रकरणी जमादार अनिल रामराव बिक्कड यांच्या फिर्यादीवरून या ५ दरोडेखोरा विरुद्ध युसूफवडगांव पोलिसात शुकवारी सकाळी गून्हा नोंद झाला .या प्रकरणातील आरोपीना शुक्रवारी केज न्यायालयात हजर केले आसता न्यायालयाने ५ ही आरोपीला ४ दिवस पोलीस कोठाडीत ठेवण्याचे आदेश दिले . दरम्यान पकडलेले संशयित दरोडेखोर पोलिसांच्या ताब्यात आहेत. त्यांच्याकडून कुठे दरोडा टाकला जाणार होता किंवा अगोदरच्या रात्री जो चार लाख रुपयाला लुटण्याचा प्रकार झाला होता. त्यामध्ये त्यांचा सहभाग आहे काय यासंदर्भात नंतर पोलिसांकडून कसलीही माहिती समोर आली नसल्याने या दोन्ही घटनेच्या तपासून नेमकं काय झालं असा प्रश्न ग्रामस्थांमधून विचारला जात आहे.

# कडा येथे आजपासून महाशिवरात्री महोत्सव

आष्टी दि ८(प्रतिनिधी) - तालुक्यातील कडा येथील महेशनगर येथे श्री महेश मंदिर ट्रस्टच्या वतीने सोमवार, दि. ९ ते सोमवार, दि. १६ फेब्रुवारी २०२६ दरम्यान बाराव्या महाशिवरात्री महोत्सवाचे आयोजन केले आहे.
या महोत्सवात ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल (अध्यक्ष, मदन महाराज संस्थान व सेवाश्रम) यांच्या रसाळ वाणीतून दररोज रात्री ६ ते ९ या वेळेत 'श्रीराम कथेची भाविकासाठी परभणी आहे. या कथेसाठी ह.भ.प. धनंजय महाराज कदम, ह.भ.प. अनिकेत महाराज चांगुणे, ह.भ.प. कृष्णा महाराज खांडगे आणि ह.भ.प. हंसराज महाराज मगर हे साथसंगत करणार आहेत. सप्ताहाच्या काळात दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ८ ते ९ विष्णू सहस्त्रनाम आणि ९.३० ते १ या वेळेत श्री शिवलीलामृत ग्रंथ पारायण पार पडेल. तसेच दुपारी २.३० ते ५ श्री संत कथा, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ आणि रात्री ९ ते पहाटे ४ या वेळेत जागर असे भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. महोत्सवाची सांगता सोमवार, दि. १६ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल यांच्या काल्याच्या कीर्तनाने होईल आणि त्यानंतर महाप्रसादाचे वाटप केले जाईल.या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी महेश गणेश मंडळ, जय हनुमान गणेश मंडळ, श्रीकृष्ण गणेश मंडळ, जय मल्हार गणेश मंडळ, सावता गणेश मंडळ आणि समस्त कडा ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत. या आध्यात्मिक सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन श्री महेश मंदिर ट्रस्ट व आयोजकांनी केले आहे.



गेवराई –महाराष्ट्र पत्रकार संघाच्यावतीने गेवराईचे ज्येष्ठ पत्रकार काझी अमान यांना मूकनायक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा निवासस्थानी जाऊन सत्कार करताना मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील

# मद्यपींच्या धिंगाण्यामुळे नागरिक त्रस्त भर चौकातील टवाळखोरीचा कळस

बीड दि ८ ( प्रतिनिधी) - शहरातील प्रभाग १३ मधील ऑफिसर कॉलनी, महाराष्ट्र हौसिंग कॉलनी, कॅनरा बँक कॉलनी येथील मुख्य चौकात गेल्या काही दिवसांपासून मद्यपी आणि टवाळखोर तरुणांनी हैदोस घातला असून, त्यांच्या वाढत्या धिंगाण्यामुळे स्थानिक रहिवाशी, नागरिक आणि पादचारी अक्षरशः त्रस्त झाले आहेत. सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर मद्यप्राशन करून गोंधळ घालण्याचे प्रमाण वाढल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकारावर लक्ष देऊन पोलिसांनी कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे यासंदर्भात सांगण्यात आले की सायंकाळ होताच मध्यरात्री पर्यंत ऑफीसर कॉलनी येथील समता प्रतिष्ठान पतसंस्था कार्यालयाच्या चौकात आणि महाराष्ट्रा हॉसिंग कॉलनीच्या मुख्य चौकात या टवाळखोर तरुणांची टोळकी मध्यरात्री पर्यंत जमा असतात. अनेकदा भररस्त्यात दुचाकी उभ्या करून आरडाओरडा करणे, अश्लील भाषेत बोलणे असे प्रकार नित्याचे झाले आहेत. विशेष म्हणजे, जवळच असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांनसाठी नवीन बांधण्यात येत असलेल्या कॉर्टरर्स मध्ये आणि कॅनरा बँक कॉलनीतील गर्गे वाचनालयाच्या संरक्षक भिंतीच्या आत बसून दारू पिण्याचे धाडस हे टवाळखोर करत आहेत. रस्त्याच्या कडेला लावलेल्या गाड्यांमुळे आणि मद्यपींच्या वादावादीमुळे वारंवार वाहतूक कोंडी होत आहे. परिसरातील व्यापारी आणि नागरिकांनी पोलीस प्रशासनाला विनंती केली आहे की, या चौकात तातडीने 'फिक्स्ड पॉइंट' देऊन पोलिसांची गस्त या भागात वाढवून मद्यप्राशन करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी येथील रहिवाशी करीत आहेत.

# एलसीबी पथकाने बेकायदेशीर वाळू वाहतूक करणारे दोन हायवा पकडले

**चकलांबा दि ८(प्रतिनिधी)– गेवराई तालुक्यातील चकलांबा पोलीस ठाणे हद्दीतील बोरगाव फाटा येथील गोदापात्रातून अवैध वाळूची वाहतूक होत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळताच शुक्रवारी दोन हायवावर कारवाई केली. पोलिसांनी यावेळी ५० लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त केला असून चकलांबा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे**
**चकलांबा पोलीस ठाणे हद्दीतून अवैध वाळू उपसा केला जात असल्याची चर्चा मोठ्या प्रमाणावर होते आहे. बोरगाव परिसरात शुक्रवारी रात्री ८श८ च्या सुमारास स्थानिक गुन्हे शाखेच्या टिमने पाठलाग करून दोन वाळूने भरलेल्या हायवावर कारवाई करत एकूण ५० लाख ६० हजाराचा मुद्देमाल जप्त केला असून सर्फराज राजू पठाण वय २९ वर्ष रा. महारटाकळी व अशोक दत्तात्रय रकटे वय ३६ वर्ष रा.मुंगी या दोघांवर चकलांबा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील कारवाई पोलिस अधीक्षक नवनित कॉवत, अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि शिवाजी बंटेवाड, यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि खटावकर, श्री. यादव, बबन सलगर, विकास राठोड, अंकुश वरपे यांनी केली असून पुढील तपास सुरु आहे.**

# उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे व खा.डॉ.श्रीकांत शिंदे यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा



बीड दि ८ (प्रतिनिधी) महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षाचे मुख्य नेते ना. एकनाथ शिंदे व संसदरत्न खा. श्रीकांत शिंदे यांचा वाढदिवस विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला.
वाढदिवसानिमित्त श्रीमंत योगी प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा राजीव नगर बहिरवाडी बीड येथे शालेय विद्यार्थ्यांना गणवेश वाटप तसेच क्रिकेट, रनिंग, कबड्डी, खो-खो, रांगोळी, निबंध, हस्ताक्षर, चित्रकला स्पर्धांचे आयोजन करून विजयी खेळाडूंना बक्षीस वितरण कार्यक्रम शिवसेनेचे बीड जिल्हा संपर्कप्रमुख मनोज शिंदे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना आयोजक तथा शिवसेना जिल्हाप्रमुख ड. चंद्रकांत नवले यांनी आपल्या शिवसेनेच्या स्थापनेपासून आम्ही सदैव शिवसेनेसोबत असून यापूर्वी शिवसेनेचा जिल्हाप्रमुख असताना संपूर्ण जिल्ह्यात शहरासह गाव, वाडी, वस्ती, तांडा, इत्यादी ठिकाणी जाऊन शिवसेनेचे विचार सर्व सामान्य जनते पर्यंत पोहोचण्यासाठी गावोगावी शिवसेना शाखा स्थापन करून सामना हे वृत्तपत्र संपूर्ण जिल्हाभर पोहोचविण्याचे कार्य केले असल्याचे नमूद केले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून मनोज शिंदे यांनी आपल्या भाषणात शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप व शिवसेना जिल्हाप्रमुख ड. चंद्रकांतआप्पा नवले यांचे भरभरून कौतुक केले
यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप, शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक, शिवसेना जिल्हाप्रमुख स्वप्निल भैया गलधर, छावाचे जिल्हाध्यक्ष अशोक अण्णा रोमन, गिरीश करवा, पप्पू शिंदे, महिला आघाडीच्या संपर्क प्रमुख संगीता ताई चव्हाण, शिवसेनेच्या फरजाना शेख, गेवराई शहर प्रमुख मुकेश महाजन, शेतकरी सेना जिल्हाप्रमुख ड. बापूसाहेब जाधव, शिवसेना तालुकाप्रमुख संतोष किसनराव जाधवसह शिवसेना पदाधिकारी शिवसैनिक तसेच शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ॲड.जगन्नाथराव पवळ यांच्याकडून एस.एम.युसूफ़ यांचा सत्कारासह गौरव



बीड दि ८ (प्रतिनिधी) - फार्मासिस्ट ॲड. जगन्नाथराव पवळ यांनी मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांना पुष्पगुच्छ व शाल देऊन त्यांच्या मुक्त पत्रकारितेचा गौरव केला. यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे यांची प्रमुख उपस्थिती होती. बीड शहरातील रहिवासी असलेले एस.एम.युसूफ़ गेल्या बारा वर्षांपासून सातत्याने मुक्त पत्रकारिता करीत आहेत. वृत्तपत्र क्षेत्रात त्यांच्या कार्याला एक तप नुकतेच पूर्ण झाले आहे. या निमित्ताने फार्मासिस्ट ड. जगन्नाथराव पवळ यांनी त्यांना आपल्या न्यू संजय मेडिकल स्टोअर्स मध्ये बोलावून शाल व पुष्पगुच्छ देत सत्कार केला. यावेळी बोलताना कोणत्याही क्षेत्रात कुठलीही अपेक्षा न ठेवता फक्त समाजासाठी झिजणे सोपे नाही आणि युसूफ़ हे गेल्या बारा वर्षांपासून सामाजिक समस्यांवर, प्रश्नांवर निस्वार्थपणे सातत्यपूर्ण कार्य करत आहेत. ही बाब बीड शहरच नाही तर संपूर्ण बीड जिल्ह्याकरिता गौरवास्पद आहे असल्याचे ॲड जगन्नाथ पवळे यांनी यावेळी नमूद केले.

# स्व.अमोल गलधर यांच्या जयंतीनिमित्त लिंबागणेश येथे रक्तदान शिबिर

लिंबागणेश दि ८ (प्रतिनिधी)स्व. अमोल गलधर यांच्या जयंतीनिमित्त स्वर्गीय अमोल गलधर युवा मंच लिंबागणेश च्या वतीने रविवार दि. ८ फेब्रुवारी रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रक्तदान शिबिर घेण्यात आले .
सुरुवातीस स्व. अमोल गलधर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. ऋषिकेश आंधळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच डॉ. गणेश ढवळे, सरपंच बालासाहेब जाधव, सेवा सोसायटीचे चेअरमन रविंद्र निर्मळ, पत्रकार हरिओम क्षीरसागर यांनी स्व. अमोल गलधर यांच्या सामाजिक कार्याचा व जनतेसाठी दिलेल्या लढ्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला.स्व. अमोल गलधर यांनी बीड रेल्वेसाठी उभारलेला संघर्ष, टॉवरवर चढून केलेले शोले स्टाईल आंदोलन, आकाशवाणी बंद पाडण्याचे आंदोलन, तसेच तत्कालीन केंद्रीय रेल्वेमंत्री ममता बॅनर्जी यांच्या पुतळ्याचे



दहन करून त्याची राख शासकीय कार्यालयात पाठवण्याचे धाडसी आंदोलन यामुळे ते सर्वसामान्य जनतेत लोकप्रिय होते. यासोबतच बीड जिल्हा रुग्णालयात गोरगरिबांच्या सेवेसाठी त्यांनी केलेले कार्य आजही प्रेरणादायी आहे, असे मत तंटामुक्ती समिती अध्यक्ष डॉ. गणेश ढवळे यांनी व्यक्त केले.
हे रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी स्व. अमोल गलधर युवा मंचचे पदाधिकारी शंकर वाणी, औदुंबर नाईकवाडे, सय्यद अख्तर, सुरज कदम, सचिन आगवान, करन वायभट, संतोष शिंदे यांनी पुढाकार घेतला. तर शिबिराला जिल्हा रुग्णालयातील रक्तपेढीचे कर्मचारी गणेश रोटे, संतोष गायकवाड, सतीश गायकवाड यांनी रक्तसंकलन केले. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी दत्ता झोडगे, ज्योत्स्ना शिंदे, सीमा हिंदोळे यांनी सहकार्य केले तसेच शिबिरास ॲड. गणेश वाणी, दादा गायकवाड, बाळकृष्ण थोरात, रामचंद्र मुळे, अक्षय येडे, गणेश घाडगे, ओंकार पवार, उमेश थोरात, बबलू आबदार, पप्पू थोरात, रोहित तागड, केशव गिरे, विजय वाणी, जीवन मुळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# धनेगाव येथे ग्रामदैवत मेसाई देवी यात्रेनिमित्त कुस्त्याचा रंगला फड



केज दि ८ (प्रतिनिधी) - तालुक्यातील धनेगाव येथे ग्रामदैवत मेसाई देवीची वार्षिक यात्रा मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. यात्रेनिमित्त गावात विविध धार्मिक व संस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तर दरवर्षीप्रमाणे याही वर्षी यात्रेनिमित्त भरवला जाणारा कुस्त्याचा फळ चांगलाच रंगला विविध ठिकाणच्या आलेल्या मल्लनी कुस्तीचा आखाडा चांगलाच गाजवला. कुस्त्यांचा फड पाहण्यासाठी परिसरातील अनेक गावच्या मोठी गर्दी केली होती.
माघ पौर्णिमेला मेसाई देवीच्या यात्रेला सुरूवात होते . पौर्णिमेच्या दिवशी फटाक्यांचा आताबाजीत देवीची पालखी काढण्यात आली यात्रे दरम्यान देवीच्या मंदिरात चार पाच दिवस भाविकांची दर्शनासाठी रांग लागली होती. विधीवत पूजा, आरती व धार्मिक कार्यक्रम पार पडले. त्यानंतर दुपारच्या सुमारास पारंपरिक कुस्त्यांचा फड रंगला. या फडात परिसरातील नामांकित तसेच नवोदित मल्लांनी सहभाग घेत जोरदार कुस्त्यांचे सामने खेळले. प्रत्येक कुस्तीला प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

# संपादकीय

## अन्नाची नासाडी सामाजिक गुन्हा

आजही आपण अन्न सुरक्षेबाबत आणि अन्नाच्या नासाडी बाबत गंभीर नाहीत असेच म्हणावे लागेल. अन्न हे पूर्णब्रह्म आहे अशी आपली संस्कृती सांगते पण ही संस्कृती आपण विसरत चाललो आहे की काय असा प्रश्न पडावा असा एक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. संयुक्त राष्ट्रे पर्यावरण कार्यक्रम आणि भागीदार संस्था डब्ल्यूआरएपी चा अहवालानुसार आपल्या देशात दरवर्षी ६८ दशलक्ष टन धान्याची नासाडी केली जाते. यातील ६१ टक्के अन्न घरातून, २६ टक्के अन्न सेवांमधून तर १३ टक्के अन्न किरकोळ क्षेत्रात वाया जाते. भारतासारख्या कृषिप्रधान देशात इतक्या मोठ्या प्रमाणात अन्न वाया जाणे ही भूषणावह बाब नाही. भारतासारख्या विकसनशील देशात जिथे दररोज साठ टक्के लोक उपाशी किंवा अर्धपोटी झोपतात तिथे अन्नाची अशी नासाडी परवडणारी नाही. वाया जाणारे हे अन्न जर गोरगरिबांच्या, भुकेल्यांच्या मुखात पडले तर देशात कोणीही उपाशी झोपणार नाही पण आपल्याला आपल्या संस्कृतीचा विसर पडत चालला आहे. आपल्याला हवे तेवढेच अन्न पानात काढून घ्यायचे आणि तेवढेच खायचे अशी आपली परंपरा आहे. खाऊन माजावे पण फेकून माजू नये अशी आपली आजी सांगायची हेही आपण विसरून गेलो आहोत. पाश्चात्य देशात हॉटेलातही पानातले अन्न टाकणे हा सामाजिक गुन्हा मानला जातो. भुकेने व्याकुळ झालेल्या लोकांची आठवणही अन्न टाकून देणाऱ्या या सोकावलेल्या श्रीमंतांना येत नाही. अन्नाची नासाडी हा सामाजिक गुन्हा आहे याचे भान अन्न टाकून देणाऱ्या श्रीमंतांना राहिले. नाही. पोटातील भुकेची आग भागवण्यासाठी देशातील कोट्यवधी लोक भीक मागतात. आदिवासी, दुर्गम भागात आजही लाखो लोक पुरेसे अन्न मिळत नाही म्हणून कुपोषित आहेत तर दुसरीकडे दररोज लाखो टन अन्न फेकून दिले जाते ही विसंगती बदलायला हवी. वाया जाणारे हे अन्न गोरगरिबांच्या मुखात पडेल अशी व्यवस्था असायला हवी. हैदराबाद, चेन्नई, दिल्ली, कोलकाता, मुंबई, बंगळुरु यासारख्या मोठ्या शहरात हॉटेल, रेस्टॉरंट, घरात उरलेले अन्न गरिबांना मिळावे यासाठी कम्युनिटी किचन ही संकल्पना अमलात आणली गेली. या संकल्पनेनुसार शहरातल्या विविध भागातल्या रस्त्यावरच्या कम्युनिटी किचन च्या केंद्रातल्या मोठ्या फ्रीजमध्ये उरलेले अन्न ठेवले जाते. भुलेल्यांनी ते काढून घ्यावे अशी सुविधा या केंद्रात आहे पण ही संकल्पना शहरातील मोठ्या शहरातच आहे, ती ही व्यापक नाही. कम्युनिटी किचन सारखी संकल्पना प्रत्येक शहरात व्यापक स्वरूपात राबवायला हवी म्हणजे वाया जाणारे अन्न भुलेल्यांच्या मुखात जाईल आणि अन्नाची नासाडीही थांबेल.

# मी तिथे गेलो कारण इतिहास पुस्तकात नव्हे, तर जमिनीत शोधायचा होता

साताऱ्याच्या संगम माहुलीत पोहोचलो तेव्हा कुठेही इथे महाराणी ताराबाई यांची समाधी आहे असा ठळक फलक दिसला नाही. रस्ता विचारत विचारत, आजूबाजूला पाहत, मनात शंका घेत घेत शेवटी जिथे उभा राहिलो, तिथे कुठलाही सन्मानाचा भाव नव्हता. माती खड्डे, चिखल, विस्कटलेले दगड, कचरा, आणि मधोमध एक साधा चौथरा. इतकंच. हेच का ते ठिकाण जिथून स्वराज्य वाचलं?

आजूबाजूला पाहिलं. कुठे कुंपण नाही, कुठे संरक्षण नाही, कुठे माहिती नाही. पाण्याचा साठा, झुडपं, बेवारस माती, आणि तुटलेला फलक. कुणी पाहुणा आलाय असं नाही, कुणी इतिहास उभा आहे असंही नाही. इथे शांतता आहे, पण ती श्रद्धेची नाही, ती विस्मरणाची आहे. ही जागा पाहताना मनात एकच विचार आला - हे दुर्लक्ष नाही, हा निर्णय आहे.

या मातीत ज्या स्त्रीने औरंगजेबासारख्या क्रूर सम्राटाला थांबवलं, ज्या स्त्रीने मराठा साम्राज्य कोसळू दिलं नाही, जिने रणांगणावर नाही तर धोरणात, धैर्यात आणि निर्धारात युद्ध जिंकलं, तिचं नाव आज इथे शोधावं लागतं. राणी होती म्हणून नव्हे, तर ती स्वराज्याची ढाल होती म्हणून. आणि आज त्या ढालीवर माती टाकली जाते.

इथे उभं राहून एक तुलना मनात आपोआप उभी राहते. त्याच महाराष्ट्रात, त्याच इतिहासात, औरंगजेबाची कबर स्वच्छ ठेवली जाते, जपली जाते, कुंपणात ठेवली जाते, ऐतिहासिक वारसा म्हणून मिरवली जाते. दख्खन जाळणारा, मंदिरे तोडणारा, लाखो हिंदूंच्या मृत्यूला कारणीभूत असलेला आक्रमक सन्मानात, आणि स्वराज्य वाचवणारी राणी विस्मरणात. हा योगायोग नाही. ही चूक नाही. हे सरळ ढोंग आहे.

इथे मराठ्यांच्या समाध्या साध्या होत्या असा फालतू बचाव केला जातो. हो, त्या साध्याच होत्या. पण साधेपणा म्हणजे बेवारसपणा नव्हे. साधेपणा म्हणजे अपमान नव्हे. आज जी अवस्था आहे ती साधेपणाची नाही, ती थुंकण्याची आहे. इतिहासावर थुंकण्याची. स्वराज्यावर थुंकण्याची.

या जागी उभं राहिल्यावर राग येतो, पण त्याहून जास्त लाज वाटते. कारण ही अवस्था एका रात्रीत झाली नाही. वर्षानुवर्षे गप्प बसून, पाहून, दुर्लक्ष करून आपणच तिला इथे आणलं आहे. सरकार दोषी आहे, पुरातत्व खाते दोषी आहे, पण गप्प बसणारा समाजही दोषी आहे.

कारण इतिहास फक्त तलवारीने नाही, तर आठवणीनेही जिवंत राहतो. आज ताराबाईंची समाधी अशी आहे कारण ती प्रश्न विचारते. ती आठवण करून देते की सत्ता हरवू शकते, पण स्वराज्य नाही. आणि म्हणूनच ही आठवण धोकादायक वाटते. म्हणूनच तिला मातीत गाडलं जातं. आधी समाधीतून, मग स्मरणातून.ही जागा पाहून लेख लिहावा लागला, कारण गप्प बसणं आता शक्य नाही. हा लेख संतापाचा आहे, पण तो रडका नाही. हा लेख आरोपाचा आहे, पण तो खोटा नाही. महाराणी ताराबाईंच्या समाधीला सन्मान मिळेपर्यंत हा प्रश्न संपत नाही. कारण इतिहास पुसला गेला, तर भविष्य उभं राहत नाही.

–प्रवीण गावंडे


## स्व.बाळासाहेब ठाकरे यांनी कला क्षेत्रासह कलाकारांना भरभरून प्रेम दिले–अशोक पटवर्धन



बीड दि ८(प्रतिनिधी)- शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्राच्या कलाक्षेत्राला व कलाकारांना भरभरून प्रेम दिले, त्यांना जपले आणि घडवले. हाच विचार हाडाचा शिवसैनिक असलेल्या शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी चंपावती महोत्सवाच्या माध्यमातून जपला आहे, असे प्रतिपादन शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोक पटवर्धन यांनी केले.

बीड येथे आयोजित चंपावती महोत्सवात उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे महाकरंडक समूह गीत गायन स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना ते म्हणाले की, कलाकारांचा बालेकिल्ला म्हणून ओळख असलेल्या बीड जिल्ह्यात कलेचे संस्कार रुजवण्याचे काम चंपावती महोत्सवातून यशस्वीपणे सुरू आहे. या माध्यमातून नव्या पिढीतील कलाकार घडत असून याचे मला प्रचंड समाधान आहे.कलाकारांच्या बालेकिल्ल्याची परंपरा व सांस्कृतिक वारसा पुढे नेत २ फेब्रुवारीपासून सुरू असलेला चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे महाकरंडक भव्य-दिव्य स्वरूपात पार पडत असून रसिकांकडून उदंड प्रतिसाद मिळत आहे. त्या अनुषंगाने दि. ७ फेब्रुवारी रोजी सकाळी, अनिल दादा जगताप फाउंडेशन व शिवसेना बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गीत गायन स्पर्धेचा उद्घाटन सोहळा अशोक पटवर्धन यांच्या शुभहस्ते उत्साहात पार पडला. यावेळी बीड जिल्ह्याचे संगीत रत्न भरत अण्णा लोळगे, सुदर्शन धूतेकर, कलावंत-पत्रकार महेश वाघमारे, संपादक संतोषजी मानूरकर, दै. पार्श्वभूमचे कार्यकारी संपादक प्रा. लक्ष्मीकांत बाहेगाव्हाणकर, दत्ताजी देशमुख, अनितातार्ई भोसले, संपादक संग्रामजी धनवे, कलावंत किशोर धुताडमाल, पूनमताई धुताडमाल, परीक्षक सौ. धुतेकर मॅडम, परीक्षक मजहरजी शेख सर, शिवसेना बीड विधानसभा प्रमुख सुनिल अनभुले, तालुका प्रमुख संतोष जाधव, आकाश जगताप तसेच प्रतिक कांबळे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

## स्व.गोपीनाथ मुंडे यांचा आवाज आजही पार्लमेंटमध्ये घुमतोय



माजी खा.स्व.गोपीनाथ मुंडे यांनी २०१० साली उर्दू भाषेच्या संरक्षणासाठी आवाज उठवला होता. त्यांनी सरकारकडे मागणी केली होती की उर्दू वर्तमानपत्रांना सरकारी जाहिराती आणि आर्थिक मदत दिली जावी. मात्र आज २०-२५ वर्षे उलटून गेली, तरी जाहिरातींच्या अभावामुळे आणि आर्थिक सहाय्य न मिळाल्यामुळे उर्दू वर्तमानपत्रे हळूहळू बंद पडत आहेत. पार्लमेंटच्या सभागृहात एक काळ असा होता, जेव्हा बीड जिल्ह्याचे माजी खासदार गोपीनाथ मुंडे यांनी उर्दूच्या हक्कासाठी ठाम आणि निर्भय आवाज उठवला होता.

त्यांनी सरकारला आवाहन केले होते की उर्दू वर्तमानपत्रांना सरकारी जाहिराती दिल्या जाव्यात, भाषिक पत्रकारितेला आधार दिला जावा, आणि उर्दूच्या संस्थांना आर्थिकदृष्ट्या मजबूत केले जावे. त्या वेळी सरकारने सभागृहात आश्वासनही दिले होते की उर्दू वर्तमानपत्रांना जाहिराती आणि आर्थिक मदत दिली जाईल.हे फक्त एक वचन नव्हते, तर पार्लमेंटच्या नोंदीत नोंदलेले आश्वासन होते.याच विषयावर आपण

दैनिक 'तामीर' मध्ये ८ ऑगस्ट २०१० रोजी एक सविस्तर लेखही लिहिला होता,ज्यात सरकारच्या या आश्वासनाचा उल्लेख होता.आणि उर्दू पत्रकारितेच्या भविष्याबद्दल आशा व्यक्त करण्यात आली होती. पण आज, जवळपास चोवीस वर्षांनंतर स्थिती अशी आहे की उर्दू वर्तमानपत्रे बंद होत आहेत,

एडिशन्स थांबत आहेत, आणि आश्वासने फाइलांमध्ये दडपली गेली आहेत.प्रश्न आजही तोच आहे:व पार्लमेंटमध्ये दिलेली आश्वासने कुठे गेली? उर्दू वर्तमानपत्रांसाठी सरकारी धोरण कुठे आहे? भाषिक पत्रकारितेला वाचवण्याची योजना कुठे आहे? त्या वेळी उठलेल्या आवाजांना जर गांभीर्याने घेतले असते, तर कदाचित आज 'राष्ट्रीय सहारा'सारखी संस्थाही

अशा प्रकारे शांत झाली नसती. हा फक्त एका वर्तमानपत्राचा प्रश्न नाही, हा पार्लमेंटच्या आश्वासनांचा आणि सरकारच्या जबाबदारीचा प्रश्न आहे. उर्दूच्या अस्तित्वासाठी आता फक्त शोक व्यक्त करण्याचा नव्हे, तर ठोस पावले उचलण्याचा काळ आहे.

सय्यद फारुख अहमद कादरी

## बौद्ध महासभा कार्यालयात माता रमाई आंबेडकर यांची जयंती साजरी



बीड दि ८ (प्रतिनिधी)- भारतीय बौध्द महासभा या मातृ संस्थेच्या विद्यामाने शहरातील बस स्थानक परिसरात असलेल्या बुद्ध विहार कार्यालय भारतीय बौद्ध महासभा येथे शनिवार सात फेब्रुवारी रोजी माता रमाई आंबेडकरांची १२८ वी जयंती मोठ्या उत्साहात थाटात-माटात साजरी करण्यात आली.

सुरुवातीस भारतीय बौध्द महासभेच्या महिला जिल्हाध्यक्ष अरुणाताई निसर्गन यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहन करुन धम्मध्वज वंदनेनंतर त्रिसरण-पंचशील सह वंदना घेवून सजवण्यात आलेल्या रथात माता रमाईच्या फोटोची बुध्द विहार संस्थेच्या कार्यालयापासून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली यानंतर११.४५ वाजता बुध्द विहार कार्यालय भारतीय बौध्द महासभा येथे महिला जिल्हाध्यक्षा अरुणाताई निसर्गन यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेचे संस्कार विभाग प्रमुख जिल्हा उपाध्यक्ष वामन निकाळजे यांचे माता रमाई आंबेडकर यांचे जीवनावर आधारित प्रवचन घेण्यात आले. भारतीय बौध्द महासभा या मातृ संस्थेच्या विद्यामाने शहरातील बस स्थानक परिसरात असलेल्या बुद्ध विहार कार्यालय भारतीय बौद्ध महासभा येथे शनिवार सात फेब्रुवारी रोजी माता रमाई आंबेडकरांची १२८ वी जयंती मोठ्या उत्साहात थाटात-माटात साजरी करण्यात आली. सुरुवातीस भारतीय बौध्द महासभेच्या महिला जिल्हाध्यक्ष अरुणाताई निसर्गन यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहन करुन धम्मध्वज वंदनेनंतर त्रिसरण-पंचशील सह वंदना घेवून सजवण्यात आले.संस्थेच्या केंद्रीय शिक्षीका महिला जिल्हा उपाध्यक्षा कांताताई जाधव, केंद्रीय शिक्षिका संजीवनीताई गडगे, कें.शि.त्रिशलाताई राऊत, नेकनूर येथील निर्मळ ताई पती-पत्नीसह मंगलाताई लोखंडे, विजयाताई जोगदंड, चंद्रभागाताई साळवे, मस्के ताई, या महिलांनी श्रीलंका पर्यटन केल्यामुळे अरुणाताई निसर्गन आणि पद्मीनीताई गायकवाड यांच्या हस्ते वरील महिलांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. तसेच रमाई जयंतीचे औचित्य साधून संस्थेचे संरक्षण उपाध्यक्ष कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी काही सैनिकांना बढती देवून असिस्टंट युनीट लिडरपदी निवड करुन त्यांना सैनिक पदाची फित लावून जिल्हाध्यक्षा अरुणाताई निसर्गन आणि राजाभाऊ आठवले यांनी असिस्टंट लीडचे स्वागत केले. ते वामन निकाळजे, नंदाताई भंडारे, मंदाताई मस्के, शोभाताई आठवले यांचा पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला. आपल्या अध्यक्षीय भाषणात अरुणाताई निसर्गन यांनी आज खर्या अर्थाने माता रमाईच्या संघर्षमय आणि त्यागमय जीवनाचा प्रत्येक महिलांनी आदर्श घेवून आपले जीवन जगले पाहिजे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गौतम खेमाडे यांनी केले व आभार बनसोडे गुरुजींनी केले.

## नजीर पठाण यांच्या इंग्रजी शाळाची उज्वल यशाची परंपरा कायम–आ.धस



पाटोदा दि ८( प्रतिनिधी)- प्राचार्य नजीर पठाण यांनी पाटोद्यात लिटल फ्लॉवर विनाअनुदानित इंग्रजी शाळा चालवुन शिक्षणार्थी विद्यार्थ्यांची यशाची उज्वल परंपरा कायम ठेवली . तर भविष्यातही या शाळेने अशीच आपली परंपरा कायम ठेवावी असे प्रतिपादन आष्टी पाटोदा शिरूर चे आमदार सुरेशआण्णा धस यांनी या शाळेच्या स्नेहसंमेलनावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना केले. शाळेचे स्नेहसंमेलन शुक्रवारी लहान मुला मुलींच्या दिमाखदार कलेचे प्रदर्शन करत आनंदी वातावरणात साजरी झाले. कार्यक्रमास व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून गट शिक्षण अधिकारी गव्हाणे सर तसेच पाटोदा पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक भगवान भाबड तसेच मराठी पत्रकार परिषद संघाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा पार्श्वभूमी चे पत्रकार अ कादर मकरानी एडवोकेट अश्रफ भाई हे होते. यावेळी आमदार सुरेश धस यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात बोलताना सांगितले की विनाअनुदयादिक शाळा चालवणे म्हणजे एक दिव्यच म्हणावे लागेल प्राचार्य नजीर पठाण यांनी पाटोदा येथे लिटल फ्लॉवर इंग्लिश स्कूल च्या माध्यमातून मोठी यशस्वी वाटचाल केली आहे या शाळेतील शिक्षणार्थ्यांना शिक्षणा सोबतच त्यांच्या कलागुणांना वाव दिला जातो भविष्यात या शाळेने याहीपेक्षा जास्त आपली प्रगती करावी असे सांगून सांस्कृतिक कार्यक्रमाच्या संदर्भात त्यांनी सर्व विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करत शाळेचे स्नेहसंमेलन सुसंस्कृत आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शैक्षणिक विकासाला चालना देणारे असते असेही आमदार धस अण्णा येणे बोलताना व्यक्त केले. शाळेच्या सीमा माळी मॅडम यांनी आपल्या प्रास्ताविकातून शाळेचा प्रगतीचा आलेख विशद करतांना उज्वला भोसले मॅडम यांनी सर्व पालकांचे शब्द सुमनाने स्वागत केले विद्यार्थी दानिश पठाण, सुजल खरमाटे, श्रेयस खंडागळे, सानप , सांगळे नम्रता, ग्रीष्मा , गार्गी घुमरे, सामीया सय्यद, आणवणे वेदिका, अनुष्का अडगळे , तेजश्री घोलप सह मोहम्मद व औफ मकराणी आदी विद्यार्थ्यांनी बहारदारपणे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अँकरिंग केली. शाळेतील शिक्षकवर्ग. वसुंधरा एकबोटे मॅडम, सावंत सर, शाहिद सर यांनी महत्वाची भूमिका बजावली. तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुषमा मिस, मंजिरी मिस, शितल मिस, सुजाता मिस, सुनीता मिस, अश्विनी मिस , प्रियंका मिस, मोहिनी मिस, रेणुका मिस, चौरे जया मिस, अश्विनी सावंत मिस, रोहिणी मिस, हमीद अंकल, शोभा मावशी आणि मंगल मावशी यांनी परिश्रम घेतले. मुलांची कला पाहून उपस्थित श्रोते गण तसेच पालक विद्यार्थ्यांच्या कलागुणाचे मोठे गोड कौतुक करताना दिसत होते शाळेचे मुख्याध्यापक पठाण नजीर सर यांनी आमदार यांना पुस्तक भेट देऊन त्यांचा सत्कार केला.

## एमएसएफमध्ये निवड झालेल्या सुपुत्राचा गोविंदवाडीत गौरव



गेवराई दि.८ (प्रतिनिधी) - गोविंदवाडी गावचे भूमीपुत्र अनिल अर्जून मोरे याची महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळामध्ये (चडऋ) निवड झाली असून त्याने मिळवलेल्या या यशाबद्दल त्याचा गोविंदवाडी या गावात यथोचित सत्कार करून गौरव करण्यात आला. या यशाचा आनंद साजरा करण्यासाठी व अनिल मोरे याच्या भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यासाठी समस्त ग्रामस्थ व मित्र परिवाराच्या वतीने सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून गेवराई पोलीस पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक पवार , रखुमाजी आबा चौधरी, श्याम आबा कुंड, पत्रकार डॉ.सुरेश गांधले, राजेश पेजगुडे, रविंद्र गिरी, डॉ.आसाराम मराठे, अर्जून मोरे, कारभारी बिचकुले, तुकाराम नरोडे, बाबासाहेब शिंगाडे, विकास शेंडगे, अण्णासाहेब मोरे, सुशील गिरी, कृष्णा शेंडगे, महादेव बिचकुले, कृष्णा कदम, मैनाजी गोडसे, महादेव मोरे, लक्ष्मण गायकवाड, विष्णू मोरे, महादेव शिंगाडे, मिनिनाथ नरोडे, शिवाजी नवले, बाळू गोरे, लक्ष्मण शिंगाडे, सुशील नवले, महादेव मराठे, प्रदीप गायकवाड, बालासाहेब झणझणे, गंगाराम नवले, निवृत्ती नवले, अंकुश मोरे, करण मोरे, विष्णू धोत्रे, बाळू मोरे, रामदास नवले, परमेश्वर नवले, गोरख मराठे, विठ्ठल पेजगुडे, बाळू कवडे, जयराम गायकवाड, नामदेव नवले, लक्ष्मण कदम, भानुदास गोडसे, दत्ता बिचकुले, मदन गायकवाड, संभाजी राजपुरे तसेच गावातील पुरुष व माता-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाराष्ट्र पत्रकार संघाच्या वतीने गेवराईत जिल्हास्तरीय विविध पुरस्कारांचे वितरण

गेवराई दि.८ (प्रतिनिधी) - प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी गेवराई येथे मूकनायक व दर्पण दिनानिमित्त महाराष्ट्र पत्रकार संघाच्या वतीने जिल्हास्तरीय विविध पुरस्कारांचे आयोजन करण्यात आले होते. हा पुरस्कार वितरण सोहळा मंगळवार दि.०३ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक सभागृह नगर परिषद गेवराई येथे मोठया उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चिंतेश्वर संस्थानचे मठाधिपती दिलीप महाराज घोगे उर्फ मसानननाथ बाबा तर उद्घाटक म्हणून गेवराईचे उपविभागीय पोलिस अधिकारी अनिल कटके हे उपस्थित होते.गेवराई येथे मूकनायक व दर्पण दिनानिमित्त महाराष्ट्र पत्रकार संघाच्या वतीने जिल्हास्तरीय विविध पुरस्कारांचे आयोजन करण्यात आले होते. हा पुरस्कार वितरण सोहळा मंगळवार दि.०३ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक सभागृह नगर परिषद गेवराई येथे मोठया उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चिंतेश्वर संस्थानचे मठाधिपती दिलीप महाराज घोगे उर्फ मसानननाथ बाबा तर उद्घाटक म्हणून गेवराईचे उपविभागीय पोलिस अधिकारी अनिल कटके हे उपस्थित होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून युवानेते यशराज भैय्या पंडित, प्रा. पी.टी.चव्हाण, प्रा.शिवाजी वराट, श्रीकात सानप, किशोर कांडेकर, कैलास माने, देविदास खरात, डॉ.चंद्रशेखर गवाई, विकास गायकवाड, सुघोष मुंढे, तुकाराम तळतकर, विश्वनाथ सोनवणे, सपोनि तांगडे साहेब, सुशील जंजाळ, साईनाथ सुरवसे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार प्राप्त मान्यवर पत्रकार मधुकर तौर दर्पण, पत्रकार काझी अमान मूकनायक, अशोक आदर्श सरपंच, बाबासाहेब खोसे आदर्श सरपंच, पवन चव्हाण युवानेता, राजेंद्र कापुरे सेवा रत्न, रामनाथ दाभाडे कृषी रत्न डॉ गजानन मस्के आरोग्य सेवारत्न, सुशील कोळेकर कलाक्षेत्र, डॉ.दताञय गुंजाळ आरोग्य सेवारत्न, श्रीराम गव्हाणे सेवा रत्न, शोहेब सय्यद आरोग्य सेवा, डॉ.शिवाजी खेत्रे आरोग्य सेवारत्न, मच्छिंद्र बेरे आदर्श सरपंच, घारगे चमन सहकार क्षेत्र, संतोष



जेथलिया उद्योगरत्न, काशिनाथ चव्हाण उत्कृष्ट शिल्पकार, गणेश सानप आदर्श शिक्षक, गावडे बाळू आदर्श शिक्षक, धर्मराज आहेर सेवारत्न, डॉ.जीवन राठोड़ आरोग्य सेवा, परमेश्वर साळुंके उत्कृष्ट संपादक, सय्यद एजाज गेवराई भुषण, गजानन काळे समाज भुषण पुरस्कार असे चोवीस विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. हा पुरस्कार वितरण सोहळा छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक सभागृह नगर परिषद गेवराई येथे पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र पत्रकार संघाचे जिल्हाध्यक तथा संपादक हुंबरे बापूसाहेब यांनी केले होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शेख खाजाभाई, चक्रधर घोडके, बंडू चौधरी, आकाश कांबळे, विलास शिंदे, अशोक कांबळे, शेख जावेद, आर्यन हुंबरे, साहिल हुंबरे, गणपत हुंबरे, निखील हुंबरे, अजीम पठाण, संतोष रासवे, बाबासाहेब उपाडे, निलेश गायकवाड, उमेश कासार, सुरेश देवकते, इम्रान सौदागर यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन अशोक गलांडे सर यांनी केले.

# डोकेदुखी

## सामान्य समस्या, पण गांभीर्याने घ्यावी अशी तक्रार



डोकेदुखी ही जगभरातील सर्वात सामान्य आरोग्य समस्यांपैकी एक आहे आणि भारतही याला अपवाद नाही. जवळजवळ प्रत्येक व्यक्तीला आयुष्यात कधीतरी डोकेदुखीचा अनुभव येतो. अनेकांसाठी ही कधीतरी होणारी त्रासदायक समस्या असते, पण काही लोकांमध्ये ती वारंवार होते आणि दैनंदिन आयुष्यावर गंभीर परिणाम करते. इतकी सामान्य असूनही डोकेदुखीकडे अनेक वेळा दुर्लक्ष केले जाते किंवा लोक स्वतःहून औषधे घेतात. न्यूरोलॉजिस्टच्या दृष्टीने डोकेदुखी ही केवळ थकवा किंवा ताणतणावामुळे होत नाही, तर काही वेळा ती शरीरातील किंवा मेंदूशी संबंधित आजाराचा इशारा असू शकते. भारतातील अभ्यासानुसार जवळपास प्रत्येक दोन प्रौढांपैकी एकाला वर्षातून किमान एकदा डोकेदुखी होते. काम करणारे लोक, विद्यार्थी आणि महिलांमध्ये ही समस्या अधिक आढळते. डोकेदुखीमुळे फक्त शारीरिक त्रास होत नाही, तर कामाची क्षमता, मानसिक आरोग्य आणि जीवनाचा दर्जाही कमी होतो.

**डोकेदुखी म्हणजे नेमके काय?**

डोकेदुखी हा स्वतः एक आजार नसून विविध कारणांमुळे होणारे एक लक्षण आहे. डोकेदुखीची तीव्रता, जागा आणि कालावधी वेगवेगळा असू शकतो. काही लोकांना डोक्याभोवती जडपणा किंवा दाब जाणवतो, तर काहींना डोक्याच्या एका बाजूला ठणकणारी वेदना होते. काही वेळा डोकेदुखी काही मिनिटे टिकते, तर काही वेळा ती अनेक दिवस राहू शकते. डॉक्टर साधारणपणे डोकेदुखीचे दोन प्रकार करतात-प्राथमिक डोकेदुखी आणि दुय्यम डोकेदुखी. प्राथमिक डोकेदुखीमध्ये कोणताही गंभीर आजार नसतो, तर दुय्यम डोकेदुखी इतर आजारांमुळे होते. या दोन्ही प्रकारांमध्ये फरक ओळखणे खूप महत्त्वाचे असते.

**प्राथमिक डोकेदुखीचे प्रकार**

ताणामुळे होणारी डोकेदुखी, भारतामध्ये सर्वात जास्त आढळणारी डोकेदुखी म्हणजे ताणामुळे होणारी डोकेदुखी. यात डोक्याभोवती घट्ट पट्टा बांधल्यासारखा त्रास होतो किंवा कपाळ आणि कनपटीत जडपणा जाणवतो. ताणतणाव, जास्त काम, चुकीची बसण्याची सवय, जास्त स्क्रीन वापर आणि झोपेची कमतरता ही याची मुख्य कारणे आहेत. शहरांमध्ये वाढलेली धावपळ आणि बसून काम करण्याची सवय यामुळे ही समस्या वाढताना दिसते. ही डोकेदुखी जीवघेणी नसली तरी वारंवार होत असेल तर कामावर आणि अभ्यासावर परिणाम होतो.

**मायग्रेन**

मायग्रेन ही डोकेदुखीची दुसरी महत्त्वाची समस्या आहे. यात डोक्याच्या एका बाजूला तीव्र ठणकणारी वेदना होते. यासोबत मळमळ, उलटी, प्रकाश आणि आवाजाचा त्रास होऊ शकतो. मायग्रेन महिलांमध्ये जास्त आढळतो आणि अनेक वेळा कुटुंबातही दिसतो. ताणतणाव, झोपेची कमतरता, वेळेवर न खाणे आणि काही पदार्थ यामुळे मायग्रेनचा झटका येऊ शकतो. अनेक लोक मायग्रेनला साधी डोकेदुखी समजतात आणि योग्य उपचार घेत नाहीत. दुय्यम डोकेदुखी: जेव्हा डोकेदुखी दुसऱ्या आजाराचा इशारा देते बहुतेक वेळा डोकेदुखी साधी असते, पण काही वेळा ती इतर आजारांमुळे होते.

**संसर्गजन्य आजार**

सायनस, व्हायरल ताप, डेंग्यू, मलेरिया आणि मेंदूज्वर यामुळे डोकेदुखी होऊ शकते. यासोबत ताप आणि अंगदुखीही असू शकते.

**उच्च रक्तदाब**

रक्तदाब खूप वाढल्यास डोकेदुखी होऊ शकते. भारतात वाढत्या रक्तदाबाच्या समस्येमुळे हे कारण ओळखणे आवश्यक आहे.

**डोळे आणि दातांचे आजार**

नंबर असलेले चष्मे न वापरणे, जास्त स्क्रीन वापरणे किंवा दातांचे विकार यामुळेही डोकेदुखी होऊ शकते.

**डोक्याला इजा आणि मेंदूशी संबंधित आजार**

कधी कधी डोकेदुखी ही मेंदूशी संबंधित गंभीर आजाराचा इशारा असू शकते. डोक्याला मार लागल्यानंतर सुरुवातीला दुखापत किरकोळ वाटली तरी नंतर सतत किंवा वाढत जाणारी डोकेदुखी होऊ शकते. काही वेळा दुखापतीनंतर काही तासांनी किंवा काही दिवसांनी मेंदूमध्ये किंवा मेंदूभोवती रक्तस्राव होऊ शकतो. विशेषतः वृद्ध व्यक्तींमध्ये किंवा रक्त पातळ करणारी औषधे घेणाऱ्या रुग्णांमध्ये अगदी छोटा पडल्याचा प्रसंगही गंभीर ठरू शकतो. मेंदूमध्ये गाठ (ट्युमर) असल्यास हळूहळू वाढणारी डोकेदुखी दिसू शकते. ही डोकेदुखी अनेकदा सकाळी जास्त जाणवते आणि त्यासोबत उलटी होणे, दृष्टी कमी होणे किंवा वागण्यात आणि स्मरणशक्तीत बदल दिसू शकतो. उच्च रक्तदाब किंवा रक्तवाहिन्या फुटल्यामुळे मेंदूमध्ये रक्तस्राव झाल्यास अचानक खूप तीव्र डोकेदुखी होऊ शकते, जी अनेक रुग्ण "आयुष्यातील सर्वात तीव्र डोकेदुखी" अशी सांगतात. स्ट्रोकमध्येही डोकेदुखी होऊ शकते, विशेषतः मेंदूच्या काही भागांवर परिणाम झाल्यास. यासोबत चेहरा, हात किंवा पाय कमजोर होणे, बोलताना अडचण येणे किंवा चालताना तोल जाणे अशी लक्षणे दिसू शकतात.ही कारणे साध्या डोकेदुखीपेक्षा कमी प्रमाणात आढळतात, पण ती गंभीर असू शकतात आणि तातडीने उपचारांची गरज असते. अचानक तीव्र डोकेदुखी, दुखापतीनंतर सुरू झालेली डोकेदुखी, सतत उलटी होणे, झटके येणे, गोंधळल्यासारखे वाटणे किंवा दृष्टीमध्ये बदल होणे ही लक्षणे दिसल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे अत्यंत आवश्यक आहे.

**दुर्लक्ष करू नयेत अशी धोक्याची लक्षणे**

काही प्रकारची डोकेदुखी गंभीर असू शकते आणि अशा वेळी त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक असते. अचानक खूप तीव्र डोकेदुखी सुरू होणे, जी आयुष्यात कधीच झाली नाही अशी वाटते, तापासोबत डोकेदुखी येणे, गोंधळल्यासारखे वाटणे, झटके येणे किंवा हात-पाय कमजोर होणे ही लक्षणे धोकादायक ठरू शकतात. डोक्याला मार लागल्यानंतर सुरू झालेली डोकेदुखीही दुर्लक्षित करू नये. डोकेदुखीसोबत डोळ्यांसमोर धूसर दिसणे, सतत उलटी होणे किंवा स्वभावात अचानक बदल होणे अशी लक्षणे दिसली तरी डॉक्टरांकडे जाणे गरजेचे आहे. ही धोक्याची चिन्हे वेळेवर ओळखल्यास गंभीर समस्या टाळता येतात आणि रुग्णाचा जीवही वाचू शकतो.

**जीवनशैली आणि पर्यावरणाचा परिणाम**

भारतात बदलत चाललेली जीवनशैली डोकेदुखी वाढण्यामध्ये मोठी भूमिका बजावत आहे. जास्त वेळ काम करणे, ताणतणाव, वेळेवर न खाणे, पाणी कमी पिणे, मोबाईल आणि संगणकाचा जास्त वापर आणि झोपेची कमतरता यामुळे डोकेदुखीचा त्रास वाढतो. शहरांमध्ये प्रदूषण, आवाज आणि गर्दी यामुळेही डोकेदुखी वाढू शकते. विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाचा ताण आणि स्क्रीनसमोर जास्त वेळ घालवण्यामुळे डोकेदुखी जास्त दिसते. गृहिणी आणि नोकरी करणाऱ्या महिलांमध्ये घर आणि काम यांचा समतोल राखताना ताण वाढतो, त्यामुळे त्यांनाही ताणामुळे होणारी डोकेदुखी जास्त होते.

**स्वतःहून औषध घेण्याची वाढती समस्या**

भारतामध्ये डोकेदुखीसाठी स्वतःहून वेदनाशामक गोळ्या घेण्याची सवय खूप वाढली आहे. अनेक लोक डॉक्टरांचा सल्ला न घेता वारंवार औषधे घेतात. या औषधांनी काही वेळासाठी आराम मिळतो, पण जास्त प्रमाणात घेतल्यास डोकेदुखी उलट वाढू शकते. काही लोकांमध्ये वारंवार औषधे घेतल्यामुळे डोकेदुखी अधिक वेळा होऊ लागते आणि ती नियंत्रित करणे कठीण होते. तसेच, दीर्घकाळ वेदनाशामक औषधे घेत राहिल्यास पोट, किडनी आणि यकृतावर वाईट परिणाम होऊ शकतो. त्यामुळे डोकेदुखीवर फक्त औषधे घेण्यापेक्षा त्यामागचे खरे कारण समजून घेणे खूप महत्त्वाचे आहे.

**डॉक्टर डोकेदुखीचे निदान कसे करतात**

न्यूरोलॉजिस्टच्या दृष्टीने डोकेदुखीचे निदान करताना सर्वप्रथम रुग्णाची सविस्तर माहिती घेतली जाते. डॉक्टर दुखण्याचा प्रकार, किती वेळ टिकते, कशामुळे वाढते, त्यासोबत इतर कोणती लक्षणे आहेत आणि पूर्वीचे आजार आहेत का, हे विचारतात. त्यानंतर न्यूरोलॉजिकल तपासणी केली जाते, ज्यामुळे गंभीर आजाराची शक्यता आहे का हे ओळखता येते. बहुतेक रुग्णांना मेंदूचा स्कॅन किंवा मोठ्या तपासण्यांची गरज नसते. मात्र, धोक्याची लक्षणे दिसत असतील किंवा डोकेदुखी वेगळ्या प्रकारे होत असेल, तर डॉक्टर स्कॅन किंवा इतर तपासण्या सुचवू शकतात. यामागचा उद्देश म्हणजे अनावश्यक तपासण्या टाळणे आणि गंभीर कारण दुर्लक्षित होऊ न देणे.

**डोकेदुखीचे उपचार आणि प्रतिबंध**

डोकेदुखीचे उपचार हे तिच्यामागील कारणावर अवलंबून असतात. ताणामुळे होणारी डोकेदुखी अनेक वेळा जीवनशैली बदलल्याने, ताण कमी केल्याने, योग्य बसण्याची सवय लावल्याने आणि कधी कधी औषधे घेतल्याने सुधारते. मायग्रेनच्या डोकेदुखीसाठी तात्काळ आराम देणारी औषधे आणि दीर्घकाळासाठी प्रतिबंधात्मक उपचार दोन्ही गरजेचे असतात. तसेच मायग्रेन वाढवणाऱ्या कारणांपासून दूर राहणे आणि नियमित दिनचर्या ठेवणे खूप महत्त्वाचे असते. इतर आजारांमुळे होणाऱ्या डोकेदुखीसाठी त्या आजारावर उपचार करणे आवश्यक असते. उदाहरणार्थ, रक्तदाब नियंत्रणात ठेवणे, संसर्गावर उपचार करणे किंवा डोळ्यांचे विकार दुरुस्त करणे.काही साध्या सवयींमुळे अनेक प्रकारची डोकेदुखी टाळता येऊ शकते. पुरेसे पाणी पिणे, नियमित झोप घेणे, मोबाईल आणि संगणकाचा जास्त वापर टाळणे, वेळेवर जेवण करणे, ताण कमी ठेवणे आणि नियमित व्यायाम करणे यामुळे डोकेदुखी होण्याचे प्रमाण कमी करता येते.

**मुलं आणि वृद्धांमध्ये डोकेदुखी**

डोकेदुखीचे स्वरूप वयानुसार बदलत असते. मुलांमध्ये डोकेदुखी अनेक वेळा ताणतणाव, डोळ्यांचे विकार किंवा मायग्रेनमुळे होते. त्यामुळे मुलांना वारंवार डोकेदुखी होत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नये.वृद्ध व्यक्तींमध्ये अचानक सुरू झालेली डोकेदुखी विशेष लक्ष देऊन तपासणे आवश्यक असते. कारण अशा वेळी स्ट्रोक किंवा टेम्पोरल आर्टरायटिससारख्या गंभीर आजाराची शक्यता असू शकते. त्यामुळे वृद्धांमध्ये नवीन प्रकारची डोकेदुखी सुरू झाल्यास डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे.

**डोकेदुखीबद्दलचे गैरसमज दूर करूया**

अनेक लोकांना वाटते की डोकेदुखी फक्त ताणतणाव किंवा कमजोरीमुळे होते. काही लोकांना वारंवार वेदनाशामक गोळ्या घेणे सुरक्षित वाटते. पण हे दोन्ही समज चुकीचे आहेत. अशा गैरसमजांमुळे योग्य उपचार घेण्यास उशीर होतो.डोकेदुखी ही वैद्यकीय समस्या असू शकते आणि तिची योग्य तपासणी व उपचार करणे आवश्यक असते. त्यामुळे डोकेदुखीकडे दुर्लक्ष न करता वेळेवर डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे.

**पुढचा मार्ग: जनजागृती आणि वेळेवर उपचार**

डोकेदुखी साधी समस्या वाटली तरी तिचा दैनंदिन आयुष्यावर मोठा परिणाम होऊ शकतो. यामुळे कामाची कार्यक्षमता कमी होते, अभ्यासावर परिणाम होतो आणि मानसिक आरोग्यावरही वाईट परिणाम होऊ शकतो. डोकेदुखीबद्दल योग्य माहिती असणे आणि वेळेवर डॉक्टरांचा सल्ला घेणे यामुळे हा त्रास कमी करता येतो आणि जीवनाचा दर्जा सुधारता येतो.

**महत्त्वाचा संदेश**

डोकेदुखी ही सामान्य समस्या असली तरी तिच्याकडे दुर्लक्ष करू नये. बहुतेक वेळा डोकेदुखी साधी असते, पण काही वेळा ती गंभीर आजाराचा इशारा असू शकते. डोकेदुखीचा प्रकार ओळखणे, स्वतःहून औषधे घेणे टाळणे, निरोगी जीवनशैली ठेवणे आणि वेळेवर डॉक्टरांचा सल्ला घेणे हे डोकेदुखी नियंत्रणात ठेवण्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. जर डोकेदुखीमुळे दैनंदिन कामात अडथळा येत असेल किंवा अचानक खूप तीव्र डोकेदुखी होत असेल, तर ते शरीर आपल्याला इशारा देत असते. अशा वेळी त्याकडे दुर्लक्ष न करता योग्य वेळी उपचार घेणे आवश्यक आहे.

**डॉ.विशाल पिंगळकर**
(न्युरो सर्जन)
विश्व हॉस्पिटल, बीड
संपर्क - ८२०८९५२४४२



# श्रीमंतयोगी आश्रम शाळेत मोबाईल मुक्त अभियान कार्यक्रम संपन्न



बीड (प्रतिनिधी) श्रीमंतयोगी प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा राजीव नगर बहिरवाडी, बीड या शाळेत श्री. सय्यद शोएब (बाबा सर) यांनी मोबाईल मुक्त अभियान या उपक्रमाचे आयोजन केले या कार्यक्रमास श्री. भोसले सर, श्री. परकाळे सर, मुख्याध्यापक श्री. भडके सर आणि श्री. सय्यद शोएब(बाबा सर) यांनी उपस्थित सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांना मोबाईल पासून होणारे दुष्परिणामाबद्दल माहिती दिली. यावेळी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री. धुमाळ सर, पर्यवेक्षक श्री. गायकवाड सर, श्री.जाधव सर, श्री. गोल्हार सर, श्रीमती. पवळ मॅडम, श्री.शेळके सर, श्री.शिंदे सर अधीक्षक श्री.नवले सर, श्री.तळेकर सर, श्री.महाडिक सर, दिलावर खान, आयन सय्यद, शेख शाफीन, शेख कैफ,शेख रेहान, सैफ ईनामदार, के.के बेग साहब.व शाळेतील विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

### प्राजक्ताताई धस यांच्या संकल्पनेतून पाटोद्याच्या

# १९ अंगणवाड्यांना 'डिजिटल पंख'

### १३ फेब्रुवारीला संयुक्त स्नेहसंमेलनात ४२ इंची एलसीडी स्क्रीनचे वितरण

**पाटोदा । महेश बेदरे**

भावी पिढी सुदृढ, सशक्त आणि आधुनिक शिक्षणाने सक्षम व्हावी या सामाजिक जाणिवेतून महानंद दूध महासंघाच्या संचालिका मा. सौ. प्राजक्ता ताई सुरेश धस (मुंबई) यांच्या संकल्पनेतून पाटोदा नगरपंचायत हद्दीतील १९ अंगणवाडी केंद्रांचे डिजिटलीकरण करण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत १३ फेब्रुवारी रोजी पाटोदा शहर व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व १९ अंगणवाडी केंद्रांना ४२ इंची एलसीडी स्क्रीन टीव्ही वितरित करण्यात येणार आहेत. प्राजक्ता ताई धस यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याच्या निमित्ताने हा उपक्रम संकल्पित करण्यात





आला होता नगरपंचायत पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने तो पूर्णत्वास नेण्यात येत आहे.पाटोदा नगरपंचायत क्षेत्रातील अंगणवाडी केंद्रांमधून लहान बालकांना पोषण आहार, आरोग्य सेवा व प्राथमिक शिक्षण दिले जाते. मात्र बदलत्या डिजिटल युगात बालकांना दृश्य माध्यमातून शिक्षण मिळावे, ई-लर्निंगद्वारे अभ्यास अधिक सोपा, रंजक आणि प्रभावी व्हावा, यासाठी आधुनिक डिजिटल सुविधांची नितांत गरज होती. ही गरज ओळखून आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून पाटोदा नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सौ. दिपाली जाधव यांनी प्राजक्ता ताई धस यांच्याकडे अंगणवाडी केंद्रांसाठी एलसीडी स्क्रीन उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती.या मागणीला तातडीने सकारात्मक प्रतिसाद देत प्राजक्ता ताई धस यांनी अंगणवाड्यांचे डिजिटलीकरण करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या संकल्पनेतून आणि पाटोदा नगरपंचायतीच्या सहकार्याने हा उपक्रम साकारत असून, नगरपंचायतीच्या वतीने १५ व्या वित्त आयोगातूनही या कामासाठी निधी उपलब्ध करण्यात आला आहे. एका एलसीडी स्क्रीनची किंमत साधारणतः २० हजार रुपये असून, सर्व एलसीडी स्क्रीन प्राजक्ता ताई धस यांच्या प्रमुख उपस्थितीत अंगणवाडी केंद्रांना वितरित केल्या जाणार आहेत.

पाटोदा शहरातील काही अंगणवाडी केंद्रांमध्ये सुविधा अपुऱ्या असल्याने लहान मुलांच्या शिक्षणात अडथळे येत होते. ही बाब अंगणवाडी प्रमुख श्रीमती ए. जे. कदम यांनी नगराध्यक्षा दिपाली जाधव, माजी सभापती राजू जाधव, गटनेते बळीराम पोटे, नयुम पठाण, सोमीनाथ कोल्हे, उपनगराध्यक्ष रोहिदास गीते सय्यद शहाबाज असिफ शेठ सौदागर किशोर अडागळे रामेश्वर गोरे हनुमंत काळे शरद बामदळ श्रीहरी गीते वाघमारे रूपाली जावळे यांच्यासह सर्व नगरसेवक सभापती यांच्यासमोर मांडली होती. ही बाब प्राजक्ता ताई धस यांच्यापर्यंत पोहोचताच त्यांनी कोणताही विलंब न करता एलसीडी स्क्रीन उपलब्ध करण्याच्या सूचना दिल्या.

एका अंगणवाडी केंद्रात साधारणतः २५ ते ३० बालके शिक्षण घेतात. एलसीडी स्क्रीनच्या माध्यमातून शैक्षणिक व्हिडिओ, बालगीते, गोष्टी, विविध खेळ व ई-लर्निंग लिंक दाखवण्यात येणार असून त्यामुळे बालकांचे शिक्षण अधिक रंजक, सुलभ आणि परिणामकारक होणार आहे. या उपक्रमामुळे पाटोदा शहरातील अंगणवाड्या आधुनिक शिक्षणाच्या प्रवाहात सामील होत असून बालशिक्षणाला नवी दिशा मिळणार आहे दिनांक १३ फेब्रुवारी रोजी प्राजक्ताताई धस व मान्यवरांच्या उपस्थितीत स्नेहसंमेलन कार्यक्रम १९ अंगणवाड्यांचा एकत्रित होणार असून या कार्यक्रमादरम्यान एलसीडीचे वितरण होणार असल्याची माहिती पाटोदा येथील अंगणवाडी केंद्राच्या श्रीमती ए. जे .कदम यांनी दिली आहे.

# मधुमेह रुग्णासाठी नेत्र पटल तपासणी शिबिर संपन्न

बीड दि ८(प्रतिनिधी) -जैन सोशल फेडरेशन अंतर्गत आनंद ऋषी वैद्यकीय आणि संशोधन केंद्राच्या आनंद ऋषी नेत्रालय अहिल्यानगर संचलित बीड येथील आनंद ऋषी नेत्रालय व डायग्नासिक सेंटर बीड येथे रविवार दि आठ फेब्रुवारी रोजी मधुमेही रुग्णांवर मधुमेहातील साखरेने त्यांच्या डोळ्यावर होत असणाऱ्या परिणामाची नेत्रपटल तपासणी डॉक्टर केतन राठोड जे या क्षेत्रातील उच्चशिक्षित व नामांकित असे अरविंद नेत्र रुग्णालयातील सुप्रसिद्ध तज्ञ नेत्र विशारद हे व आनंद ऋषी नेत्रालय अहिल्यानगर येथील तज्ञ डॉक्टर अशोक महाडिक यांच्या पथकाने केली.

या शिबिरामध्ये १२८ रुग्णांची तपासणी केली. काही रुग्णांवर औषधोपचार करून काही रुग्णाला साखरेने झालेल्या परिणामावर शस्त्रक्रिया करण्याचे त्यांनी सुचित केले.

मधुमेहाचे निदान झाल्यानंतर रुग्ण घाबरला जातो आणि या मधुमेहाचा संपूर्ण शरीरावर असर पडतो यातच डोळ्यावर जर असर पडला तर त्याला अंधत्व येण्याची भीती असते म्हणून अशा शिबिराची अत्यावशकता असते अशा तपासणीला बाहेरील मोठ्या रुग्णालयात जावे लागते मात्र आज या संस्थेमार्फत असे शिबिर घेऊन रुग्णांना दिलासा देण्याचे काम केले या शिबिराच्या यशस्वीतेसाठी समाजसेवक गौतमजी खटोड व डॉक्टर पवार आणि येथील रुग्णालयातील गव्हाणे व त्यांचा पूर्ण स्टाफ यांनी सहकार्य केले या कार्यक्रमास बीड नगरपालिकेचे नगरसेवक दिनेश जी मुंदडा उद्योजक कासटजी आणि संपत शेठ मुनोत यांनी विशेषत्वाने भेट देऊन अशा स्तुत्य उपक्रमाबद्दल डॉक्टराचे अभिनंदन केले.

## जाहिर प्रगटन

आमचे पक्षकार नामे श्री. अरुण कल्याणराव जुजगर रा. जुजगर गल्ली, माजलगाव ता. माजलगाव जि. बीड यांनी दिलेल्या माहिती अधिकार व सूचनेवरून सर्व जनतेस कळवण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी विठ्ठल दशरथ दळवी रा. शिवाजी नगर, माजलगाव ता. माजलगाव जि. बीड यांची (माजलगाव नगर परिषद हद्दीतील सर्व्हे नं. ३८७ गट क्र.२४७ जिचा न.प. मालमत्ता क्र.२६/९५ असुन जिची लांबी दक्षिणोत्तर ३३ फुट व रुंदी पूर्वपश्चिम १६.५ फुट असून ज्याचे एकूण क्षेत्रफळ ५४४.५० चौ.फुट आहे.ज्याची चतुःसीमा

**पूर्वेस:** राजाभाऊ दळवी यांचे घर, **पश्चिम :** माळीन बाई यांची जागा, **दक्षिण :** सोनवणे यांचे घर, **उत्तरेस :** रस्ता.

वरील वर्णनाची व चतुर्सिमेच्या आतील मिळकत आमचे पक्षकार यांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचा ठराव केलेला आहे. ठरावानुसार सदर मालमत्ता हि निर्विवाद बिनबोजा व नीरजोखमी असल्याची हमी व खात्री उपरोक्त नमूद मिळकत धारक यांनी दिली आहे. तरी सदर मिळकतीबाबत व्यवहाराबाबत कोणासही कसल्याही प्रकारची हरकत जसे की, हक्कसंबंध, चोळी, बांगडी, गहाण, तारण, दानपत्र, नोटरी दस्त, बक्षिशपत्र, मृत्युपत्र, मुखत्यारपत्र, इनाम, लेखी अथवा तोंडी खरेदीखत, बँक कर्ज, खाजगी कर्ज, शासकीय अथवा निमशासकीय कार्यालयात मिळकत हस्तांतरण कायद्यातील कोणत्याही तरतुदीप्रमाणे सदर मिळकतीबाबत व व्यवहाराबाबत हक्क अथवा आक्षेप असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत जाहीर प्रगटन देणार यांच्या नमूद पत्त्यावर सदर मिळकती बाबतच्या सर्व कागदपत्रासह संपर्क साधावा, मुदतीत कोणाचाही आक्षेप आला नाही तर कोणाचाही आक्षेप नाही असे समजून व ग्राह्य धरून सदर मिळकतीबाबत पुढील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणारे आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन.

**जाहिर प्रगटन देणार - श्री.अरुण कल्याणराव जुजगर**
**रा. माजलगाव ता. माजलगाव जि.बीड. मो क्र. ९७६७४१७७२२**

**मार्फत : ॲड.अभिलाष माणिकचंद श्रीश्रीमाळ**
**(जिल्हा व सत्र न्यायालय, माजलगाव) मो.क्र. ८८०५३३२१११**
**मंगलनाथ मल्टीस्टेट च्या समोर, नावंदर कॉम्प्लेक्स माजलगाव**
**ता. माजलगाव जि. बीड**

# श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग पिंपळवंडी येथे आज पासून महाशिवरात्री महोत्सव



पिंपळवंडी दि.८ (प्रतिनिधी) - पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग महादेव मंदिर देवस्थान येथे प्रति वर्षाप्रमाणे महाशिवरात्री महोत्सव प्रित्यर्थ दि.९ फेब्रुवारी सोमवार ते दि. १६/०२/२०२६ सोमवार दरम्यान मठाधिपती ह.भ.प.गुरुवर्य महंत स्वामी महादेवानंद भारती महाराज, व ह.भ.प.परमानंद भारती महाराज अश्वत्थलिंग संस्थान यांच्या मार्गदर्शनात श्री.संत तुकाराम महाराज गाथा पारायण व अखंड विनावादन सप्ताह सोहळा संपन्न होत आहे.आज सोमवार रोजी ग्रंथ व विनापूजन होऊन सोहळयास प्रारंभ होईल.सप्ताह सोहळ्यात पहाटे ४ ते ६ काकडा आरती,६ ते ७ श्रीस अभिषेक,७ ते ८ विष्णू सहस्त्रनाम स्तोत्र हनुमान चालीसा,८ ते १२ श्री. संत तुकाराम महाराज गाथा पारायण,दुपारी १२ ते २ भोजन,३ ते ५ प्रवचन,५ ते ६ हरिपाठ,रात्री ७:३० ते ८ भोजन,८:३० ते ११ या वेळेत हरिकिर्तन,रात्री ११ ते पहाटे ४ पर्यंत हरिजागर,संगीत भजन,भारुड धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन आहे. या सप्ताह सोहळ्याची सोमवार दि. १६/०२/२०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन होऊन मठाधिपती ह.भ.प. गुरुवर्य श्रीश्री १००८ स्वामी महादेवानंद भारती महाराज यांचे काल्याचे किर्तन होऊन,महाप्रसादाने महाशिवरात्री महोत्सवाची सांगता होणार आहे.सोमवार दि. ९ रोजी ह.भ.प.परमानंद भारती महाराज अश्वत्थलिंग संस्थान यांचे प्रवचन,तर ह.भ.प.शिवानंद भारती महाराज दत्त संस्थान तांबाराजुरी यांचे किर्तन.दि. १० मंगळवार ह.भ.प.महादेव काळसुले महाराज आळंदी,व ह.भ.प.भागवत कापसे सर चंद्रेवाडी यांचे प्रवचन,तर ह.भ.प.दत्ता महाराज बेदरे निरगुडी यांचे किर्तन. बुधवार दि.११ ह.भ.प.संतोष भारती महाराज मुंगसवाडे,व ह.भ.प. सखाराम महाराज ढास मुळुक यांचे प्रवचन,तर ह.भ.प.मारुती महाराज झिरपे चापडगाव यांचे कीर्तन. गुरुवार दि.१२ ह.भ.प.शंकरानंद गिरी महाराज सारणी-सांगवी (केज),व ह.भ.प. अनंत मुळे काका लिंबागणेश यांचे प्रवचन,व ह.भ.प. दिव्यानंद गिरी महाराज त्रिंबकेश्वर यांचे किर्तन.गुरुवार दि.१३ ह.भ.प. गोपाळानंद गिरी महाराज नेवासा,व ह.भ.प.एम.डी.साबळे सर साबळेवाडी यांचे प्रवचन,तर ह.भ.प. परमानंद भारती महाराज अश्वत्थलिंग संस्थान यांचे किर्तन.शनिवार दि. १४ ह.भ.प.मीनाताई मडके महाराज चापडगाव,व ह.भ.प.सुवर्णानंद महाराज यांचे प्रवचन,व ह.भ.प. विष्णू देवानंद भारती महाराज मणेश्वर संस्थान गेवराई यांचे किर्तन. रविवार दि. १५/०२/२०२६ रोजी ह.भ.प.जनार्दन बांगर महाराज यांचे प्रवचन,व संध्याकाळी ७ ते ९ या वेळेत ह.भ.प.सोनलताई करपे महाराज कल्याण स्वामी संस्थांच्या चकलांबा,व रात्री ह.भ.प.गुरुवर्य महंत महादेवानंद भारती महाराज यांचे (महाशिवरात्री शिवपूजन) किर्तन होईल.

## कै.बि.दे.राठी राजस्थानी प्राथमिक विद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम उत्साहात संपन्न



बीड दि.७ (प्रतिनिधी) : कै. बी.दे.राठी राजस्थानी प्राथमिक विद्यालयाचा वार्षिक स्नेह संमेलन कार्यक्रम अतिशय भव्य दिव्य अशा उत्साही वातावरणात पार पडला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव रामेश्वर कासट साहेब,तर प्रमुख अतिथी म्हणून बीड जिल्हा परिषद लेखा वित्त अधिकारी आबासाहेब घायाळ,नगरसेवक शुभम धूत,नगरसेवक नितीन साखरे,समाजसेवक अजय सवाई आणि युवा उद्योजक निलेश संचेती यांची उपस्थिती होती.सर्वप्रथम पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि सरस्वती मातेचे व नटराज मूर्ती पूजन करण्यात आले. यानंतर कार्यक्रमाची सुरुवात पाहुण्यांच्या हस्ते हवेमध्ये गॅस फुगे सोडून करण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक महेश पारिख सर यांनी केले.कार्यक्रमांमध्ये बालवाडी ते सातवीच्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता त्यांनी देशभक्तीपर गीत, बालगीत,लावणी,घूमर, पारंपारिक गीत,तसेच छावा चित्रपटातील संभाजी महाराज, कवीकलश व औरंगजेब यांची भूमिका सादर करणारे गीत कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले गेले.हा वार्षिक स्नेहसंमेलन भव्य दिव्य स्वरूपात पार पडला गेला.या कार्यक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.पालक वर्ग सुद्धा खुश होता.यावेळी विद्यार्थ्यांवर बक्षीसांची खैरात पालकातर्फे करण्यात आली.यावेळी राजस्थानी सेवा समाज संस्थेचे सर्व पदाधिकारी का उपस्थित होते.तिन्ही शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुलकर्णी मॅडम व पांचारिया मॅडम यांनी केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक महेश पारिख सर, माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका आरती कलंत्री मॅडम,शाळेचे सांस्कृतिक विभाग प्रमुख सिकची सर,इगडे सर,डावकर सर,एकशिंगे सर,पंडित सर,लोहिया सर,बागडे सर,कुलकर्णी सर,धारूरकर मॅडम, राडीकर मॅडम,देशमुख मॅडम,राऊत मॅडम,शेलार मॅडम,गीता शिंदे,उमेश कोठी,रमेश शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले.

पार्श्वभूमी

दि.०९ फेब्रुवारी २०२६ सोमवार



## ॲड.जयराम सजगणे यांना मातृशोक



माजलगाव दि.८ (प्रतिनिधी):-वकील संघाचे माजी अध्यक्ष ॲड.जयराम सजगणे यांच्या मातोश्री शशिकलाबाई श्रीमंतराव सजगणे यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी दिनांक ८ फेब्रुवारी रात्री एक वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दिनांक ८ फेब्रुवारी वार रविवार रोजी सकाळी दहा वाजता तेलगाव खुर्द येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पंचक्रोशीतील विविध राजकीय,सामाजिक, शैक्षणिक,आर्थिक क्षेत्रातील पान २ वर

## शिरूर तालुक्यात २७ गावांसाठी आठ गावांत मोफत आरोग्य शिबीर-भाग्यश्री ढाकणे



मानुर दि.८(प्रतिनिधी):- शिरूर कासार तालुक्यातील २७गावांतील नागरिकांसाठी आठ गावात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, धर्मदाय रूग्णालय मदत कक्ष, श्री साई सेवाभावी शिक्षण संस्था व शिरुर व खालापूरी प्राथमिक आरोग्य केंद्र यांचे संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन केले गेले असुन या शिबीरात रक्तदाब, रक्त तपासणी, बी पी शुगर आणि नेत्र पान २ वर

## आ.सुरेश धस यांनी लक्ष घालण्याची तालुक्यातील शेतकऱ्यांची मागणी

# महारेशीम अभियान : सत्य की फक्त कागदावरच ?



पाटोदा दि.८(प्रतिनिधी):- राज्यात रेशीम उत्पादनाला चालना देण्यासाठी महारेशीम अभियान राबवले जात असल्याचे शासनाकडून सांगितले जात असले तरी पाटोदा तालुक्यात या अभियानाचे प्रत्यक्ष स्वरूप अद्याप दिसून येत नाही. तालुक्यातील कोणत्याही विभागाकडे या योजने संदर्भात अधिकृत माहिती उपलब्ध नसल्याने इच्छुक शेतकरी संभ्रमात सापडले आहेत.

महासांगवी व पिंपळवंडी परिसरात काही शेतकऱ्यांनी रेशीम उत्पादन यशस्वी करून दाखवले असून तालुक्यात या शेतीसाठी पोषक वातावरण आहे. असे असतानाही नोंदणी, प्रशिक्षण, अनुदान किंवा तांत्रिक मार्गदर्शन याबाबत तालुकास्तरावर कोणतीही माहिती नसल्याचे चित्र आहे.कृषी विभागाकडे चौकशी केली असता तालुका कृषी अधिकारी ओंकार शेळके यांनी अधिकृत माहिती नसल्याचे सांगितले. पंचायत समितीचे गटविकास अधिकारी उद्धव सानप यांनाही योजनेबाबत माहिती नसल्याचे स्पष्ट झाले. जिल्हा पातळीवरील संबंधित अधिकारी वराट यांच्याशी संपर्क साधला असता कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.डिसेंबर महिन्यात झालेल्या आढावा बैठकीत आ.सुरेश धस यांनी रेशीम उत्पादनाबाबत शेतकऱ्यांना माहिती देण्याचे निर्देश दिले होते. मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणी न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी असून, महारेशीम अभियानाला चालना देण्यासाठी आ.सुरेश धस यांनी वैयक्तिक लक्ष घालावे, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.रेशीम उत्पादनासाठी अनेक शेतकरी तयार आहेत, पण शासनाच्या योजनेची माहितीच मिळत नसेल तर पुढे कसे जायचे ? असा सवाल भाई विष्णुपंत घोलप, सरचिटणीस, शेतकरी कामगार पक्ष यांनी केली आहे.

### ई-केवायसी पोर्टल पुन्हा सुरू, ३१ मार्चपर्यंत दुरुस्तीची संधी-जे.डी.शाह

## जिल्ह्यातील पन्नास हजार लाडक्या बहिणींना दिलासा



बीड - मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी ई- केवायसी प्रक्रिया करताना चुकीचा पर्याय निवडलेल्या लाभार्थींना महिला आणि बालविकास विभागाने चूक सुधारण्याची संधी दिली आहे. त्यानुसार लाभार्थी महिलांना ३१ मार्च २०२६ पर्यंत ही चूक सुधारता येईल. त्यानंतर यापुढे कोणत्याही परिस्थितीत सुधारणा करण्याची संधी दिली जाणार नाही, असे यासंदर्भातील शासन परिपत्रक जारी केले आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील पन्नास हजार लाडक्या बहिणींना दिलासा मिळाला आहे. तरी बीड जिल्ह्यातील सर्व लाडक्या बहिणींनी आपल्या जवळच्या महा-ई सेवा केंद्र किंवा आपले सरकारच्या अधिकृत संकेतस्थळावर अचूक माहिती भरून केवायसी दुरुस्ती करून घ्यावी असे आवाहन समाजसेवक जे.डी.शाह यांनी ऐका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.पत्रात पुढे म्हटले आहे की राज्य सरकारच्या महत्वाकांक्षी लाडकी बहीण योजनेचा पान २ वर

# अवैध धंद्यावर माजलगाव शहर पोलीसांची कारवाई



माजलगाव दि.८(प्रतिनिधी):- माजलगाव शहर पोलीसांनी विशेष पथक तयार करुन पो.स्टे. हद्दीतील भिमनगर येथे अवैधरित्या सुरु असलेल्या तिर्रटच्या आड्यावर छापा मारुन पाच जणांवर कारवाई केली.

भिम नगर परीसरामध्ये शेख युनुस अब्बास, मारोती घनशाम साळवे, जमिल सुजात शेख, असलम बीबन शेख सर्व रा. माजलगाव हे अवैध्यरीत्या तीरट नावाचा जुगार खेळत असताना मिळुन आल्याने त्यांचे ताब्यात रोख रक्कम, मोबाईल, व तीरट जुगाराचे साहीत्ये असा एकुण ५८,६०० /- रु.चा मुद्देमाल मिळुन आला तर सचिन लक्ष्मण शिंदे रा. चिंचगव्हाण हा चिंचगव्हाण जिल्हा परीषद शाळेच्या १०० मीटर परीसराचे आतमध्ये सिगारेट व तंबाखुजन्य पदार्थ यांची विक्री करत असताना मिळुन आला व त्याचे ताब्यात एकुण १६३५/- रु.चा मुद्देमाल मिळुन आल्याने पान २ वर




नारायणा ईटेक्नो स्कूलमध्ये पार पडलेल्या सायकल स्पर्धेमध्ये अर्पित अनिल यादव याने प्रथम क्रमांक पटकावला....

# जिल्ह्यातील सर्व आरोग्य संस्थांमध्ये एकाच वेळी स्वच्छता मोहीम

### जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सतीशकुमार सोळुंके यांची माहिती

बीड दि.८(प्रतिनिधी):-जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक स्वच्छ, सुरक्षित व रुग्णहिताची व्हावी या उद्देशाने संपूर्ण जिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये एकाच वेळी व्यापक स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांचा समावेश होता.

या स्वच्छता मोहिमेबाबत माहिती देताना जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.



सतीशकुमार सोळुंके यांनी सांगितले की, रुग्णालयातील स्वच्छता ही केवळ सौंदर्यापुरती मर्यादित नसून ती थेट रुग्णांच्या आरोग्याशी संबंधित आहे. संसर्गजन्य आजार रोखण्यासाठी व रुग्णांना सुरक्षित वातावरण देण्यासाठी स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत आहे.या मोहिमेदरम्यान रुग्णालय परिसर, वॉर्ड, शस्त्रक्रिया कक्ष, बाह्यरुग्ण विभाग, पान २ वर

## आयेशा टूर्सच्या शाखेचे दिमाखात उद्घाटन



बीड दि.८(प्रतिनिधी):-मराठवाड्यातील हज आणि उमरा यात्रेकरूंना दर्जेदार सेवा देण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या औरंगाबाद येथील आयेशा टूर्स'ने आता बीड शहरात आपली पाळेमुळे विस्तारली आहेत. औरंगाबादचे प्रसिद्ध सय्यद अझहर यांच्या मार्गदर्शनाखाली, बीड येथील बागवान कॉम्प्लेक्स (सरकारी दवाखाना रोड, बशीरगंज) येथे आयेशा टूर्सच्या नवीन शाखेचा उद्घाटन समारंभ काल उत्साहात पार पडला. या शाखेच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील नागरिकांना हज आणि उमरा यात्रेसाठी लागणाऱ्या सर्व सुविधा आता स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहेत. या शाखेची धुरा बीडचे ओनर सय्यद एजाज यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. सर्वसामान्यांच्या आग्रहास्तव आणि यात्रेकरूंची सोय व्हावी, या उदात्त हेतूने ही शाखा सुरू करण्यात आली आहे.आयेशा टूर्सचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ व्यवसाय म्हणून याकडे न पाहता, 'खिदमत-ए-हुज्जाज' (यात्रेकरूंची सेवा) हे मुख्य ध्येय समोर ठेवले आहे. सय्यद अझहर भाई आणि त्यांची संपूर्ण टीम यात्रेकरूंना अत्यंत जिव्हाळ्याची आणि उत्तम दर्जाची सेवा देण्यासाठी कटिबद्ध आहे. पान २ वर

## कडा येथे आजपासुन महाशिवरात्र महोत्सवास प्रारंभ बबन महाराज बहिरवाल यांची रंगणार श्रीराम कथा

कडा दि.८(प्रतिनिधी)- आष्टी तालुक्यातील कडा येथील महेशनगर येथे श्री महेश मंदिर ट्रस्टच्या वतीने १२ व्या महाशिवरात्री महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, दि. ९ फेब्रुवारी ते सोमवार, दि. १६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत हा भक्तिमय सोहळा पार पडणार असून यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. या महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल (अध्यक्ष, मदन महाराज संस्थान व सेवाश्रम) यांच्या रसाळ वाणीतून दररोज रात्री ६ ते ९ या वेळेत रंगणारी 'श्रीराम कथा' हे आहे. या कथेसाठी ह.भ.प. धनंजय महाराज कदम, ह.भ.प. अनिकेत महाराज चांगुणे, ह.भ.प. कृष्णा महाराज खांडगे आणि ह.भ.प. हंसराज महाराज मगर हे कलाकार साथसंगत करणार आहेत.सप्ताहाच्या काळात दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ८ ते ९ विष्णू सहस्त्रनाम आणि ९:३० ते १ या वेळेत श्री शिवलीलामृत ग्रंथ पारायण पार पडेल. तसेच दुपारी २:३० ते ५ श्री संत कथा, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ आणि रात्री ९ ते पहाटे ४ या वेळेत पान २ वर

## मिस्त्रीला अडवून तिघांनी मारहाण करून २० हजारांचा ऐवज केला लंपास

अंबाजोगाई दि ८ (प्रतिनिधी)-- शहरातील एका बिअर बारसमोर असलेल्या आडस फाटा परिसरात एका मिस्त्रीला अडवून तिघांनी जबरदस्तीने लुटल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ऑनलाईन पैशांची विचारणा केली असता आरोपींनी संगनमत करून मारहाण केली आणि २० हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. याप्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. केज तालुक्यातील मोजे होळ येथील शेख इमरान दस्तगीर व्यवसायाने मिस्त्री असून कामासाठी अंबाजोगाई परिसरात आले होते. ६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७वाजेच्या सुमारास इमरान हे आडस फाटा येथील एका बिअर बारसमोर उभे होते. त्यांनी तिथे असलेल्या तीन अनोळखी तरुणांना तुमच्याकडे ऑनलाईन पैसे आहेत का? पान २ वर

### मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते तौरल इंडिया प्रकल्पाचे उद्घाटन संपन्न

## भगवानगड व नारायणगडाच्या मठाधिपतींनी दिला एकतेचा संदेश

अहिल्यानगर दि ८(प्रतिनिधी)- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या व संत महंतांच्या उपस्थितीमध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील सुपा येथे तौरल इंडिया प्रकल्पाचे उदघाटन संपन्न झाले.तौरल इंडियाचा हा प्रकल्प महाराष्ट्राच्या औद्योगिक आत्मनिर्भरतेचे प्रतीक आहे. स्वतंत्र व आत्मनिर्भर भारत घडविण्यासाठी 'मेक इन इंडिया' संकल्पना अत्यंत महत्त्वाची आहे. ज्या वस्तूंची आपल्याला आयात करावी लागते. पान २ वर





बीड : राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या निधनानंतर बारामती येथे भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार, पार्थ पवार यांची भेट घेऊन सांत्वन केले. तसेच, दिवंगत अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.



बीड : मिलिया बॉईज हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे माजी प्राचार्य अब्दुल सत्तार हे मक्का मदीना होऊन उमरा करून आले असता त्यांना शुभेच्छा देऊन सत्कार करताना समाजसेवक मुसाखान पठाण, फिरोज खान पठाण, व अकबर सिद्दिकी दिसत आहेत.

## बकरवाडी येथे 'आदर्श शिक्षक पुरस्कार' सोहळा उत्साहात संपन्न

### बबनराव मस्के सरांच्या स्मृतिप्रीत्यर्थ उपक्रम; कल्पना अंग्रे यांचा गौरव

बीड/घाटसावळी दि.८(प्रतिनिधी):- मुले शिकली तरच गावाचा आणि समाजाचा विकास होतो, हा विचार आयुष्यभर जपणाऱ्या स्व. बबनराव बाबुराव मस्के (सर) यांच्या जयंतीनिमित्त बकरवाडी (ता. के. घाटसावळी) येथे 'आदर्श शिक्षक पुरस्कार' वितरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यावर्षीचे हे उपक्रमाचे सलग पाचवे वर्ष होते. पुरस्काराने सन्मानित यंदाचा आदर्श शिक्षक पुरस्कार जि. प. प्राथमिक शाळा बकरवाडी येथील शिक्षिका श्रीम. अंबुरे कल्पना अरुण यांना देऊन गौरवण्यात आले. शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल उपस्थितांनी त्यांचे विशेष कौतुक केले. मान्यवरांची उपस्थिती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शांतिब्रह्म ह. भ. प. नवनाथ महाराज (गोरक्षनाथ टेकडी) होते. प्रमुख पाहणे म्हणून खालील मान्यवर उपस्थित होते. सिद्धेश्वर माटे (ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी, बीड),चाभोरे सर (केंद्रप्रमुख, घाटसावळी), श्रीम. भगणे मॅडम (केंद्रीय मुख्याध्यापिका),बाबुराव घोरड (मुख्याध्यापक,



महादेव वाडा), सौ. सुधामती गोविंदराव वाघ व नामदेव वाघ (शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ) याशिवाय सरपंच बाबासाहेब पवार,लिंबराज गाडे, सदाशिव गाडे,त्रिंबक काळे, अशोक गाडे आणि हरीश अंबुरे यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली. शैक्षणिक कार्याचा गौरव व सामाजिक बांधिलकी यावेळी पान २ वर

# घरकुलचे थकीत हप्ते तातडीने द्या व मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा

बीड दि ८(प्रतिनिधी)- प्रधानमंत्री आवास योजना (घरकुल) अंतर्गत लाभार्थ्यांना अद्याप थकीत असलेले हप्ते तातडीने त्यांच्या खात्यात वर्ग करण्यात यावेत, जेणेकरून घरकुलाच्या पुढील बांधकामाला गती मिळेल, अशी मागणी शाह अल्पसंख्यांक बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे पदाधिकारी शेख जेबा कदीर यांनी नगरपालिका प्रशासनाकडे केली आहे.

शहरात सध्या मोकाट कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणावर सुळसुळाट वाढला असून शाळकरी मुलांवर हल्ल्याच्या घटना घडत आहेत. यामुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच ज्येष्ठ नागरिकांनाही मोकाट कुत्र्यांचा मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले.या दोन्ही गंभीर प्रश्नांवर नगरपालिकेने तात्काळ



उपाययोजना कराव्यात. अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराही जेबा कादिर शेख. अब्दुल कदिर शेख. जावेद शेख यांनी केली यांनी दिला आहे.

## पाटोदा सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने शिवजन्मोत्सव सोहळा

पाटोदा दि.८(प्रतिनिधी):- छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त पाटोदा शहरात सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने शिवजन्मोत्सव सोहळा २०२६ भव्य, दिव्य आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात येणार असून या निमित्ताने तीन दिवस विविध सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १६ व १७ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ऑपेन्स मंगल कार्यालय, पाटोदा येथे लहान बालकलाकारांपासून युवकांपर्यंत वयोगटानुसार सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले जाणार असून या कार्यक्रमांच्या माध्यमातून शिवचरित्र, देशभक्तीपर सादरीकरणे आणि लोककलेचा संगम पाहायला मिळणार आहे, तसेच उपस्थित नागरिकांसाठी



भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. दि. १८ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण व पूजन करण्यात येणार असून त्यानंतर नगरपंचायत हद्दीतील इयत्ता १ ली ते १० वीच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, विद्यार्थ्यांसाठी रंगोळी स्पर्धा तसेच सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी खेळ पैठणीचा 'होम मिनिस्टर' हा लोकप्रिय कार्यक्रम होणार असून विजेत्यांसाठी पान २ वर

## गण गण गणात बोते.. जय श्री गजानन

### गेवराई येथे 'श्रीं'चा प्रकट दिन उत्साहात साजरा



गेवराई दि.८ ( प्रतिनिधी ) :- संत गजानन महाराज की जय,गण गण गणात बोते च्या जय घोषात शहरातील संत गजानन महाराज मंदिरात रविवार दि.८ फेब्रुवारी रोजी विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले त्याचबरोबर शेकडो भाविकांनी 'श्रीं'चे दर्शन घेवुन महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी संत गजानन महाराज सेवा समितीचे सदस्य व भक्तगण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित पान २ वर

CMYK